रविवार, 3 जुलै 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 299
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 3 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-299 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-14 ● PRICE-5

# न्यायालय पक्षांना बांधील नाही

## सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी सुनावले खडेबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशात सध्या सुरू असलेल्या परिस्थितीवरून सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी राजकीय पक्षांना खडे बोल सुनावले. राजकीय पक्षांना वाटते की न्यायव्यवस्थेने त्यांच्या कृतींचे समर्थन केले पाहिजे. पण आम्ही राज्यघटने प्रति बांधील आहोत. न्यायपालिका ही एक स्वतंत्र संस्था आहे, आमची जबाबदारी केवळ संविधानाप्रति बांधिलकी राखणे आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा विचारसरणीला उत्तर देण्यास न्यायालय बांधील नाही, अशा अतिशय स्पष्ट शब्दांत सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी राजकीय पक्षांना सुनावले.**

अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को कॅलिफोर्निया येथे असोसिएशन ऑफ इंडो-अमेरिकनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सरन्यायाधीश यांनी याबाबत सांगितले. ते म्हणाले की, भारत देशाला स्वातंत्र्य मिळून आता ७५व्या वर्षे झाली आहेत. आपल्या प्रजासत्ताकालाही ७२ वर्षे पूर्ण झाली आहेत.
पण मला खेदपूर्वक म्हणावे लागेल की, घटनेने प्रत्येक संस्थेला नेमून दिलेल्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांचे पूर्ण कौतुक करायला आपण अजूनही शिकलेलो नाही. सरकारच्या प्रत्येक कामाला न्यायालयीन पाठिंबा मिळायला हवा, असे सत्तेत असलेल्या पक्षाला वाटते. न्यायपालिकेने त्यांची राजकीय स्थिती आणि कारणे पुढे करावीत



अशी विरोधी पक्षांची अपेक्षा आहे.

राजकीय पक्षाची भूमिका समजून घेण्याची विचार प्रक्रिया संविधान आणि लोकशाहीच्या आकलनाच्या अभावामुळे उद्भवते. सामान्य जनतेमध्ये पसरलेले अज्ञान हेच अशा विचारसरणीला मदत करते. न्यायव्यवस्था ही स्वतंत्र आहे. त्यामुळे न्यायपालिका ही संविधानाला उत्तर देण्यास बांधील आहे. भारतातील घटनात्मक संस्कृती आपण पुढे नेण्याची गरज आहे. अमेरिकन समाजाचा सहिष्णू आणि सर्वसमावेशक स्वभाव आहे. तो जगभरातील सर्वोत्कृष्ट प्रतिभावंतांना आकर्षित करतो. त्यामुळे त्यांच्या विकासाला हातभार लागतो, असेही सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद बरखास्तीमागे राजकारण नाही : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद बरखास्तीमागे कोणतेही राजकारण नाही. देशातील, राज्यातील अनेक क्रीडा संघटनांचा अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. मी कायम अशा संघटनांच्या कामांचे दोन भाग करतो. एक भाग खेळ, खेळाडूंबाबत आणि दुसरा भाग क्रीडा संस्थेच्या प्रशासनाबाबत. परंतु मी त्यांच्या अंतर्गत गोष्टीत कोणत्याही प्रकाराचा हस्तक्षेप केला नाही, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे.
शरद पवार म्हणाले, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचा मी अध्यक्ष आहे. राष्ट्रीय, राज्य स्पर्धांचे आयोजन करणे हे माझे काम आहे. मी त्यांच्या प्रश्नांसाठी परिषदेवर गेलो होते. क्रीडा संघटनांना मैदान मिळणे कठीण असते. त्यामुळे क्रीडा क्षेत्राला खासगी किंवा सरकारी मदत मिळवून देणे हे माझे आहे. मी कधीही अंतर्गत गोष्टींमध्ये हस्तक्षेप केला नाही. राहुल आवारे, अभिजीत कटके, उत्कर्ष काळे, किरण भगत यांना मी मदत केली. अनेक खेळाडूंना वैद्यकिय किंवा आर्थिक मदत मी केली आहे. आयुष्यात



मी पहिल्यांदा खेळाडूंना जाहीर केलेल्या मदतीबाबत सांगितले आहे. कोणत्याही राज्यातील कुस्तीगीर परिषदेबाबात तक्रारी असतील तर त्याबाबत निर्णय घेणे राष्ट्रीय कुस्तीगीर संघटनेला टाळता येत नाही. या कारवाईच्या आधी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेला कोणतीही पूर्वसूचना किंवा स्पष्टीकरण मागण्यात आले नव्हते. पण मी त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी रामदास तडस आणि काका पवार यांच्यासोबत एकत्र येऊन बैठक घेणार असल्याचे देखील शरद पवार म्हणाले.

# ५६७ कोटी रुपयांची कामे थांबवली; सेनेनंतर आता राष्ट्रवादीला दणका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर 'ॲक्शन मोड'मध्ये आलेले दिसत आहेत. मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने जिल्हा नियोजन समितीच्या ५६७ कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती दिली आहे. घाईघाईत या कामांना मंजुरी का? असा प्रश्न उपस्थित करत शिंदे-फडणवीस सरकारने हा निर्णय घेतला आहे.
एकनाथ शिंदे यांनी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना या विषयावरून फैलावर घेतले आहे. कार्यसमितीची बैठक घेऊन घाईने या कामांना मंजुरी का देण्यात आली, असा सवाल शिंदेंनी केला. तसेच ५६७ कोटी रुपयांच्या जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देण्यात आली. हा माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांना मोठा धक्का मानला जात आहे.

**आधी शिवसेनेला धक्का, आता राष्ट्रवादीला झटका**

शिंदे-फडणवीस यांनी सत्तास्थापनेनंतर लगेचच निर्णयांवर भर दिला आहे. ज्या दिवशी शपथ घेतली त्याच दिवशी शिंदे-फडणवीसांनी मुंबई मेट्रोच्या आरे कारशेडला मान्यता देत



शिवसेनेला धक्का दिला. फडणवीस सरकारच्या काळात आरे जंगलात मेट्रो कारशेड तयार करण्याचा निर्णय वादग्रस्त ठरला होता.
त्यावेळी मुंबईकरांनी उत्स्फुर्तपणे याला विरोध केला. या विषयात शिवसेनेनेही उडी घेत या मागणीला पाठिंबा दिला. महाविकासआघाडी सरकार आल्यानंतर आरेमधील प्रस्तावित कारशेड कांजूरमार्ग येथे हलवण्यात आली. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा हा निर्णय फिरवला आहे.

# जितेंद्र आव्हाड विरोधी पक्षनेते पदासाठी आघाडीवर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विधानसभेत विरोधी पक्षनेते पदासाठी राष्ट्रवादीकडून जितेंद्र आव्हाड यांच्या नावाचा विचार सुरू असून शरद पवार यांचे निष्ठावंत आणि अभ्यासु, आक्रमक चेहरा आणि शोषितांचा आवाज अशी राज्यभर ओळख आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातीलच मुंब्रा मतदारसंघात बहुसंख्य मुस्लिम, दलित मतदार असताना निवडून येण्याचा चमत्कार त्यांनी केला आहे. रोखठोकपणा आणि पुरोगामी विचाराच्या तत्वाशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड न करण्याची भुमिका यामुळे आव्हाड हे विद्यमान सरकारच्या समोर आव्हान उभे करण्यासाठी सक्षम होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप नसल्याने त्यांचे सार्वजनिक नैतिक वजन अधिक मानले जाते.
महाराष्ट्रात शिवसेनेतील स्वतंत्र गटाचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार अस्तित्वात आले आहे. विधानसभेत राष्ट्रवादीचे संख्याबळ अधिक असल्याने विरोधी पक्षनेते पदासाठी चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासमोर तगडे आव्हान उभा करण्याची क्षमता असलेल्या नेत्याचा शोध पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याकडून सुरू असुन त्यांच्यासमोर जितेंद्र आव्हाड यांचे नाव आघाडीवर आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष पद जयंत पाटील यांच्याकडे आहे. त्यामुळे



सामाजिक जातीय समीकरणात विरोधी पक्षनेते पद हे ओबीसी आणि आक्रमक चेहरा असलेल्या जितेंद्र आव्हाड यांच्याकडे दिले जाऊ शकते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातीलच मुंब्रा विधानसभा मतदारसंघातून आव्हाड प्रतिनिधीत्व करतात.
बहुसंख्य मुस्लिम, दलित आणि इतर मतदार असलेल्या मतदारसंघातून आव्हाडांनी निवडून येण्याचा चमत्कार घडवला आहे. आक्रमकपणा, रोखठोक भूमिका आणि सर्वंकष अभ्यास, शोषीत वर्गाचा बुलंद आवाज अशी ओळख असल्याने जितेंद्र आव्हाड यांचा राज्यभर प्रभाव आहे. पुरोगामी विचाराशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड न करण्याची त्यांची भूमिका आणि शरद पवार यांच्याशी एकनिष्ठपणा या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. गृहनिर्माण मंत्री म्हणून अडीच वर्ष काम करताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झाला नसल्याने त्यांचा सार्वजनिक पातळीवर नैतिक प्रभाव मानला जातो. त्यामुळे विद्यमान सरकारसमोर आक्रमकपणे सभागृहात आणि बाहेर संघर्ष करण्यासाठी जितेंद्र आव्हाड हे सक्षम ठरू शकतात असा विश्वास पक्षातील नेत्यांना आहे. त्यामुळे जितेंद्र आव्हाड यांच्याकडे विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी दिली जाईल असे मानले जात आहे.

# अकोल्यात पट्टेदार वाघ मृतावस्थेत


## २ वर्षाचा असताना आईपासून दुरावला होता; वनविभाग म्हणतो, आपल्या परिसरात वाघ नव्हे

आधुनिक केसरी न्यूज

अकोला : जिल्ह्यातील सोनखास - मोझर वनपरिसरात एक पट्टेदार वाघ मृतावस्थेत आढळून आला आहे. हा घातपात आहे की वाघाचा नैसर्गिक मृत्यू आहे. याबाबत शंका उपस्थित केल्या जात आहे. दरम्यान, गेल्या सहा महिन्यांपूर्वी राष्ट्रवादीच्या पदधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील याच परिसरात वाघाचा वावर असून यासंदर्भात अनेकदा वनविभागांना माहीती दिली होती. मात्र, वनविभागाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही. त्यानंतर या वाघाचा दुर्देवी मृत्यू झाला आहे. आता वाघाच्या मृत्यूप्रकरणी वनविभागाच जबाबदार असा आरोप वन्यप्रेमी करीत आहेत तर विधान परिषद आमदार अमोल मिटकरींनी उपवनसंरक्षकांना पत्र देत प्रकरण अत्यंत गंभीर आहे. सखोल चौकशी करा आणि अहवाल सादर करा, अशी पत्राद्वारे मागणी केली आहे.
जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील आसपास असलेल्या गावांमध्ये वाघाचे दर्शन घडत आहे. तर जवळा शेतशिवारात वाघ दिसल्याचा व्हिडिओ गावकऱ्यांनी काढला असल्याची माहिती अकोला वनविभागाला दिली. त्यानंतर वनविभागाने वाघ शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र, या शोधमोहिमेत वनविभागाला यश आले नाही. परिणामी, परिसरात भीतीचे वातावरण पसरले. तरीही आपल्या परिसरात वाघ नसल्याचा दावा वनविभाने केला होता. मात्र, आता जवळा परिसराच्या अगदी दहा किमी अंतरावरच असलेल्या सोनखास - मोझर वनपरिसरातील नदीच्या काठावर वाघाचा मृतदेह आढळून आला. दरम्यान, हा घातपात आहे की वाघाचा नैसर्गिक मृत्यू आहे? याबाबत शंका उपस्थित केल्या जात आहेत. या वाघाच्या अंगावर कुठल्याही जखमा नसल्याचे दिसून येत आहे.
वन विभागाला घटनास्थळ गाठले आणि तपास सुरु केला. सद्यस्थितीत या वाघाचे शवविच्छेदन केले असून वैद्यकीय अहवाल अजून मिळाला नाही. या वाघाचे वय सुमारे चार ते पाच वर्ष आहे. अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वळोदे यांनी बोलताना दिली.
वाघाच्या मृत्यूप्रकरणी वनविभागाच जबाबदार असल्याची खंत वन्यप्रेमींनी व्यक्त केली आहे. कारण काही महिन्यांपूर्वी याच



परिसरातील नागरिकांनी वाघ दिसल्याची माहिती अकोला वनविभागाला दिली होती. त्यावेळी वाघाचा व्हिडिओ देखील कॅमेऱ्यात कैद झाला होता. मात्र, तरीही वनविभागाने याची दखल घेतली नव्हती. त्याचवेळी वनविभागाने या परिसरात ट्रॅप कॅमेरे लावले असते तर कदाचित वाघाचा जीव वाचला असता आणि वाघाला सुरक्षितस्थळी नेण्यात आले असते. अशी खंत अनेकांनी व्यक्त केली आहे.
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा वाघ त्याच्या आईपासून वयाच्या २ वर्षाचा असताना दुरावला होता. कारंजा यवतमाळ वन परिसरातून हा वाघ अकोला जिल्ह्यात आला असल्याचे सांगण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षापासून अकोला जिल्ह्यात शेजारी जिल्ह्यात भटकंती करत असल्याचे बोलले जाते. सहा महिन्यापूर्वी अकोल्यात या वाघाचे दर्शन घडले होते.
आईपासून दुरावल्यानंतर गेल्या दोन वर्षापासून हा वाघ जिल्ह्यात अनेक भागात भटकंती करायचा. दरम्यान, अनेक शेतकरी आपल्या पिकावर रासायनिक औषधांची फवारणी करतात नंतर औषध पाण्यात मिसळायचे. हेच पाणी प्यायल्याने वाघ आजारी झाला होता यातून त्याला शिकार करण अवघड झाले म्हणजेचे वाघाचा 'स्लो-पॉयझन' झाल्याने मृत्यू झाला आहे, अशी शंका उपस्थित केली जात आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# आनंद आणि उत्साहमूर्ती : श्री गुरुमूर्ती सर

आपल्या जीवनात आपल्याला अशा काही व्यक्ती भेटतात की एकदा भेटल्यानंतर त्या आपल्या आयुष्याचा एक भाग होऊन राहतात. आम्हाला अशीच भेटलेली एक व्यक्ती म्हणजे कर्नाटकातील होस्पेट येथील श्री ए एम गुरुमूर्ती सर. खरे तर सी ए असलेली माझी मुलगी सारिका आणि जावई श्री सतीशराव यांच्या ते परिचयाचे. त्यांच्या माध्यमातूनच आमची आणि त्यांची भेट, ओळख झाली. त्यानंतर गुरुमूर्ती सर म्हणजे आमच्या कुटुंबाचा एक भाग होऊन गेले. त्यांच्या आणि आमच्या परिचयाला आठ दहा वर्षे तरी झाली असतील. आमच्या कुटुंबात कोणताही अगदी छोटासा घरगुती कार्यक्रम असला तरी आम्हाला गुरुमूर्ती सरांची आठवण हटकून येते. आम्ही त्यांना हक्काने आणि प्रेमाने बोलावतो आणि तेही अगत्याने आमच्या कार्यक्रमाला येतात. ते चाळीसगाव सारख्या माझ्या गावी छोट्या मोठ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने दोन तीन वेळा येऊन गेले. पुण्यातही आमच्याकडे अनेकदा ते येऊन गेले. माझ्या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी एकदा ते चाळीसगावात आणि एप्रिल २०२२ मध्ये पुण्यात उपस्थित होते.

गावातल्या गावातही एखाद्या कार्यक्रमाला जाण्याचा बऱ्याच वेळा आपल्याला कंटाळा येतो. कधी कधी आपण फक्त जवळचे आणि आवश्यक संबंध आहेत अशाच ठिकाणी जातो. पण गुरुमूर्ती सरांचे मला नेहमी आश्चर्य वाटत आले आहे. कर्नाटकातील होस्पेट या गावाहून ते वेळ काढून आपल्याकडे येतात. त्यांना ज्या प्रकारे शक्य होईल तसे ते येतात. बस, रेल्वे किंवा विमानप्रवासही करतात. काहीच शक्य नसेल तर ड्रायव्हरला घेऊन स्वतःच्या गाडीने येतात. खरं म्हणजे अशा वेळी त्यांच्या जागी दुसरी कोणीही व्यक्ती असती, तर रिझर्वेशन मिळत नाही. गाडीने येणे शक्य नाही कारण लांबचा प्रवास आहे असे सहज सांगू शकली असती. पण ज्याला मनापासून येण्याची इच्छा असते, तो अशा लंगड्या सबबी कधीच पुढे करीत नाही. त्यातीलच एक म्हणजे गुरुमूर्ती. सर येताना कधीही रिक्त हस्ते येत नाहीत. ज्यांच्याकडे जायचे त्यांच्यासाठी काहीतरी खास असे ते घेऊन येतात. चेहऱ्यावर कायम मंद स्मित विराजमान असते. एवढे करून आपण काही विशेष करतो आहोत अशा प्रकारची कोणतीही भावना त्यांच्या वागण्याबोलण्यात डोकावत नाही. नाहीतर आपण एखाद्याकडे गेलो तर, ' आलो रे बुवा तुझ्याकडे वेळ काढून. ' अशा प्रकारची भावना व्यक्त करून समोरच्याला एक प्रकारे आपल्या उपकाराच्या ओझ्याखाली ठेवू पाहतो.

मला कधी कधी वाटायचं की कसं शक्य होतं गुरुमूर्ती सरांना हे येणं ? **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# सौंदर्याचा शोध घेणे कधीही थांबवू नये

आधुनिक केसरी

आपल्या दैनंदिन जीवनात आपण नेहमीच सौंदर्याला पाधान्य देत असतो. ते मिळवण्यासाठी आपण विविध प्रकारे प्रयत्नशील असतो. ह्या सौंदर्याची व्याख्या करणं शक्य असलं तरीही त्याची प्रचिती प्रत्येकानं स्वतंत्ररित्या अनुभवायची असते. व्यक्ति तितक्या प्रकृती, त्यामुळेच प्रत्येकाला सौंदर्याची प्रचिती निरनिराळ्या प्रकारे येत असते. जगण्यापलीकडचं जीवन जगणे, ही देखील एक अत्यंत महत्वपूर्ण कला आहे. आपल्या जीवन जगण्याच्या कलेतील हे सौंदर्य म्हणजे नेमके काय? ते कशासाठी आणि कसं मिळवायचं? त्यासाठी काय करावं लागतं? अशा अनेकविध प्रश्नाची उत्तरं शोधण्यासाठी खरी जरूरी असते ती निरीक्षण, परीक्षण आणि समीक्षणाची. सौंदर्याचा शोध कधी संपतच नसतो. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अगदी जन्मापासून प्रत्येक क्षणामध्ये, बाबीमध्ये सौंदर्याचा शोध आपण घेतला पाहिजे. ह्या सौंदर्याच्या प्रचीतीमुळेच आपला जीवन जगण्याचा अनुभव हटके असू शकणार आहे, ह्याची जाणीव होणं गरजेचं असतं. कला ही विविध गोष्टीतून आपल्याला दिसून येत असते. ही कला जोपासण्याचं, तिचं अस्तित्व टिकवून ठेवण्याचं काम हे आपण प्रत्येकजण निरनिराळ्या प्रकारे करत असतो. अशा ह्या कलेचे कोणकोणते उपयोग आपल्याला होतात? त्यामुळे आपली संस्कृती कशी अबाधित राहते? ह्याची जाणीव करून घेणं गरजेचं असतं. एखाद्या कलाकारास त्याचे विचार जगासमोर आणायचे असतील तर ते कलेच्या विविध माध्यमातून तो आणत असतो. चित्रकला, शिल्पकला, नाट्यकला, नृत्यकला, पाककला, हस्तकला अशा अनेकविध माध्यमातून साकारलेल्या कलेतून आणि मांडलेल्या अविष्कारातून नवीन पिढीपर्यंत त्याला त्याचे विचार पोहोचवता येतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-28

# छंद असावा...

आधुनिक केसरी

छंद व आवड बऱ्याचदा दोन्ही एकच समजतात .पण दोन्ही वेगळे आहेत. माणसाला आवड व छंद दोन्ही असावेत. सवड मिळेल तेव्हा आवड जोपासली जाते. पण छंद जोपासायला सवडीची गरज नसते. फक्त छंदीफंदी मात्र नसावं. मला असं वाटतं छंद असणारे माणसं खूप सुखी असतात. कारण एकटं वाटलं बोअर झालं तर आपल्याला मन रमवण्यासाठी आपला छंद असतोच. जसा आपल्याला एखादा छंद असतो तसाच मुलांना ही छंद असावाच. तो आपण लावला पाहिजे. कोणत्या गोष्टीत आपल्याला त्यांना आवड निर्माण करता येईल व कोणता सोपा छंद त्यांना लावता येईल यासाठी आई-बाबांनी प्रयत्न करावेत. मुळात आपल्याला आवड पाहिजे .आपल्याला जरी छंद नसेल तरी मुलांना लावा. गाणे ,नृत्य ,लेखन, ऐकणे, पाहणे ,निरीक्षण ,वाचन, गप्पा, जिज्ञासू वृत्ती, कामात मदत करणे, अभ्यास अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्यांचे रूपांतर छंदात होते. एक चांगला छंद व्यक्तीला जडतो आणि तो नेहमीच सुखी राहतो. त्यात मैत्रीचा छंदही असू शकतो. वाऱ्याला ज्याप्रमाणे गंध हवा असतो त्याप्रमाणे माणसालाही मैत्रीचा छंद हवा असतो. छंद असणारे लोक आयुष्यात कधीच कंटाळवाणे दिसत नाही. खाण्याचाही छंद असू शकतो पण तो प्रमाणात असावा. छंद जोपासताना आणखी नवीन ज्ञानाची ,नात्याची, त्यागाची, प्रेमाची, सहकार्याची भावना देखील निर्माण होते.माणसं जोडली जातात आणि छंदामुळे मुलं गुंतून राहतात. टीव्ही, मोबाईल मात्र जास्त नको .मोबाईल तर नकोच नको .चांगले छंद सर्वांनी लावून घ्या .मुलांनासुद्धा लावा....

# साथ संगत

आधुनिक केसरी

माणसाच्या आयुष्यात सर्वात जास्त संस्कार संगतीच्या द्वारे होतात त्यामुळे संगत खूप महत्त्वाची असते आज मी याच विषयावर तुमच्याशी बोलणार आहे. साथ संगत किती महत्त्वाचा, मोलाचा हा शब्द आहे मित्रांनो मी तरी म्हणेन प्रत्येक माणसाचं जीवनच यावर अवलंबून आहे, पहा ना प्रत्येक व्यक्तीला घरात बसणे हे शक्य नाही तो चार चौघात जाणार, मित्रांना भेटणार, समाजात जाणार प्रत्येक ठिकाणी तो वावरणार तीथूनच त्याच्या जीवनाची वाटचाल सुरू होते. घरातूनच आईवडीलांनी लावलेल्या संस्कारात आधी तो परीपक्व झाला की, कोणताही, अथवा कशाही मित्रामध्ये बसुदेत काहीही त्यावर दूर्गुणांचा बदल होत नाही, आधी त्या पाल्यावर पालकांनी मायेचा हात फिरवत, जवळ घेऊन समाजात वावरण्या आधी चांगले धडे, ज्ञान देणे खूप गरजेचे आहे, मित्र तर म्हणणारच काही होत नाही रे आणि आपलं मूल तिथूनच,चूकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता असते, मूलांना धाक हा एकाचा तरी असणं गरजेचं आहे. आपलं मूल बाहेर काय करते आहे, मित्र कोण आहेत याची पडताळणी आई वडीलांनी आवर्जून केली पाहीजे....

"साथसंगत" हीच प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे, चांगल्या "साथसंगतीने" माणूस कुठल्या कुठे पोहोचतो, अशी अनेक उदाहरणे आपण रोजच्या दैनंदिन जीवनात पहात आलो आहोत, जर " साथसंगत" चांगली नसेल तर पूर्ण आयुष्याचा नासाडा होतो, अन् शेवट आई वडीलांच्या हातात अश्रूंच्या धारा यापलीकडे काही नसते. "साथसंगती" ने माणसाची आपली एक प्रतीमा तयार होत असते, आणी आपण कोणाबरोबर बोलायचं ,कुठे बसायचं, उठायचं, म्हणजेच परत इथं तोच शब्द येतो तो म्हणजे आपण कोणाबरोबर साथसंगत करायची.. हा विषय खूप मोठा आहे थोडक्यात मी मांडण्याचा प्रयत्न केला, ब-याच काही यामधून आपणांस टिप मिळाल्या असतील. तर मित्रांनो चांगल्या लोकांमध्ये बसा,उठा यावरच आपलं व्यक्तिमत्त्व अवलंबून आहे.

**-सौ. भाग्यश्री दायमा**

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**सृजति तावदशेषगुणाकरं
पुरुषरत्नमलङ्करणं भुवः ।
तदपि तत्क्षणभङ्गि करोति चेद्
अहह कष्टमपण्डितता विधेः ॥**

**अर्थ : विधाता पृथ्वीस अलंकारूप, गुणनिधी अशा नररत्नांना उत्पन्न करतात. परन्तु त्यांच्या जीवनास क्षणभंगूर बनवतात. अहा! विधात्याची ही मूर्खता किती कष्टप्रद आहे? गुणी माणसे अल्पायुषी असतील, तर ते कसे जगासाठी अनुपयुक्त किंवा हानिकारक ठरते, याचे वर्णन भर्तृहरींनी या श्लोकात केले आहे.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# मायोद्भव निरूपण

आधुनिक केसरी

चळणे व ढळणे म्हणजे बदल होणे हे द्रुश्याचे धर्मत्याच्या ठिकाणी नाहीत. ते तुटत नाही फुटत नाही. त्याचे विभाग करता येत नाहीत,त्याची रचना करता येत नाही ते अक्षय आहे म्हणून ते -हास पावत नाही. असे ते परब्रह्म आहे त्याच्या विषयावर कितीही लिहिले तरी कमीच पडणार आहे. ते सगळीकडे असल्याने सर्वकाळ समोरचं असते ते अत्यंत निर्दोष आणि निव्वळ चराचरात व्यापून राहिले आहे. आकाशपाताळ व्यापून राहिल्याने ते सर्वांच्या अंतर्यामी वास करते. पुढच्या समासात समर्थांनी राजहंस पक्षाची उपमा दिली आहे. कधीही नाश न पावणारे ब्रम्ह निर्गुण आहे. आपण ज्याला 'माया' म्हणतो ती कधीही नाश पावते ती सगुण असते. पण परमत्वाचा अभ्यास करत असताना असे दिसुन येते की मायेमध्ये सगुण व निर्गुण यांचे मिश्रण असते. कसे ते आता पाहू!

या द्रुश्य विश्वामध्ये आपण जन्मतो,सगुण व निर्गुण यांच्या मिश्रणामध्ये आपल्याला रहावे हे लागणारचं आहे. पण राजहंस जसे पाणी व दूध निराळे करून दूध पितो व पाणी बाजूला काढतो तसे साधकाने विवेकाने द्रुष्य वेगळे काढावे व आत्मस्वरूप सेवावे. त्याच प्रमाणे ज्ञानी पुरुष मायेतील सगुणनिर्गुणाच्या मिश्रणातून सगुण बाजूला काढून निर्गुण सेवन करतात. पंचमहाभूतांपासून जे जे निर्माण होते ते ते मिश्रित व जड असते. सर्व व्यापक आत्मा त्यामध्ये अंतर्यामी पणाने असतो. शाश्वत काय अशाश्वत काय याचा अभ्यास केल्याने ते समजते. आपण ऊस खातो चोयट्या टाकून देतो. बोरं खातो आठळ्या टाकून देतो फळे खातो बिया फेकून देतो तद्वतच जग ऊस आहे अशी कल्पना केली तर परमात्मा त्यातील रस समजावा। याही ठिकाणी हेच सांगणे आहे की साधकाने विवेक करावा आणि जगातील जगदात्मा ओळखावा व बाकीचे जड द्रुष्य टाकून द्यावे अजुनही एका सोप्या आपल्या बोली भाषेत सांगते की 'कुठेही वावरत असताना आपण आजूबाजूच्या क्षेत्रातील "चांगले ते घ्यावे व वाईट ते फेकून द्यावे".

आत्मा रस आहे अशी कल्पना केली तरी ती अपूर्ण आहे कारण रस पातळ व नाशवंत आहे तर आत्मा निश्चळ व शाश्वत आहे. तर रस अपूर्ण असतो पण आत्मा सर्व बाजूने परिपूर्ण आहे हे ओळखावे.

द्रुष्य जगात वावरत असताना आत्म्यासारखी एखादी वस्तु असती तर तिच्यावरून आत्मा कसा आहे हे बरोबर सांगितले असते. पण संपूर्ण विश्वात तशी वस्तू नाही म्हणून द्रुष्टांताच्या मते आत्मा कसा आहे हे समजून घ्यायला हवे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# गुरुसेवा करणे म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग, वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ति व्हावी म्हणून. तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवावयाचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ति करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते. गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा व्हावा म्हणून मागतो; तेव्हां माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन, मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार



नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे.

'मला सर्व कळते' असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच. कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे.

गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एकच झाले पाहिजे. म्हणजे दैववशात जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हाला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

**आजचे बोधवचन :** नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे.

-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# आत्महत्यामुक्त महाराष्ट्रासाठी 'हे' कायदे करा रद्द

## किसानपुत्र आंदोलनाची मुख्यमंत्र्यांना पत्रे

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट्र करायचा असेल तर शेतकऱ्यांना गळफास ठरलेले १) कमाल शेतजमीन धारणा कायदा २) आवश्यक वस्तू कायदा 3) जमीन अधिग्रहण कायदा हे कायदे रद्द करावे लागतील. अशी मागणी किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना करण्यात आली आहे.

किसानपुत्र आंदोलनाचे डॉ राजीव बसरगेकर यांनी मुख्यमंत्र्याना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन. त्याहूनही जास्त, मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्या दिवसातच आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यां विषयी चिंता व्यक्त केलीत, आणि हा प्रश्न महत्त्वाचा आहे याची जाणीव दाखवल्याबद्दल अभिनंदन आणि धन्यवाद. महाराष्ट्र राज्य अनेक बाबतीत आघाडीवर असले, तरीही ते शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत सुद्धा आघाडीवर आहे, ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे कारण म्हणजे शेती व्यवसायात सतत होत जाणारा तोटा, त्यातून वाढणारा कर्जबाजारीपणा, आणि त्यामुळे सतत ढासळणारी शेतकऱ्यांची पत. या सर्वांच्या मुळाशी आहेत. शेतकरी विरोधी कायदे. तीन महत्त्वाचे शेतकरी विरोधी कायदे शेतकऱ्यांवर आत्महत्यांची वेळ आणत आहेत. १. कमाल शेत जमीन धारणा कायदा २. आवश्यक वस्तू कायदा. आणि
३. जमीन अधिग्रहण कायदा. यातील पहिला सिलिंगचा कायदा राज्य सरकारच्या अखत्यारित आहे, या कायद्यामुळे जमिनीचे लहान लहान तुकडे पडत गेले. राज्य सरकार हा कायदा रद्द करू शकते, आपण हे तातडीने करावे अशी आपल्याला विनंती आहे. बाकीचे दोन कायदे हे केंद्र सरकारच्या अखत्यारित असले, तरीही राज्य सरकार, राज्य सरकारच्या कायदेमंडळात तसा ठराव करून, केंद्र सरकारला हे कायदे रद्द करण्याची शिफारस करू शकते.

आपण हेही तातडीने करावे, आणि आपण शेतकरी आत्महत्यांविषयी दाखवलेल्या चिंतेला एक प्रत्यक्ष कामाची दिशा द्यावी ही आग्रहाची आणि कळकळीची विनंती. किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने राजीव बसर्गेकर, नवी मुंबई याच आशयाचे पत्र संदीप धावडे (वर्धा), रवींद्र पवार (जळगाव), ॲड. भूषण पाटील (औरंगाबाद), अमर हबीब (आंबाजोगाई) आदी अनेकांनी पाठवली आहेत.

# अँब्युलन्स हेल्परायडर्स ग्रुप तर्फे डॉक्टरांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** अँब्युलन्स हेल्परायडर्स ग्रुप तर्फे डॉक्टर्स डे निमित्त शहरातील अनेक नामांकित हॉस्पिटल्समध्ये भेट देऊन तेथील सर्व मुख्य डॉक्टर्स व स्टाफ यांना सन्मान चिन्ह आणि गुलाबपुष्प देऊन डॉक्टर डे निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. वैद्यकीय क्षेत्रात रुग्णसेवेत स्वतःला वाहून घेतलेल्या या सर्व देवदूतांना आजच्या दिवसाचे निमित्त साधून सन्मानचिन्ह व गुलाबपुच्छ देऊन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे एक छोटेसे काम अँब्युलन्स हेल्प रायडर्स या संस्थेच्या वतीने करण्यात आले. संस्थेतील सदस्यांनी आज औरंगाबाद शहरातील विविध हॉस्पिटलमधील डॉक्टर्सची भेट घेतली. यात युनायटेड सिग्मा, आनंदी हॉस्पिटल, जे.जे.प्लस, जी आय वन, मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटल, दहिफळे, इंडोवर्ल्ड, धूत, हेडगेवार, गजानन, अमृत, एशियन सिटी केअर, टाकळकर स्किन केअर, ओरियन सिटी केअर, इंदूरकर हॉस्पिटल, वरद हॉस्पिटल, अमृत बाल रुग्णालय सहित शहरातील 70 डॉक्टर्स यांचा सत्कार करण्यात आला.

ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्स चे मुख्य समन्वयक संदीप कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. यावेळी भूषण कोळी, ॲड. श्रीकांत मिश्रा, अभिषेक कादी, प्रसाद कस्तुरे, निलेश सेवेकर, आदित्य भाले, मुकेश गाडेकर, रणजित साळुंके, मनोज जैन, अमित व्यवहारे, स्मिता पटारे, मीना घुमरे व इतर अनेक अँब्युलन्स हेल्प रायडर्स परिवारातील सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# कांचनवाडी कृषि महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे शिल्पकार, समता, मानवतेसाठी झटणाऱ्या महामानवापैकी एक असणारे, सतत ११ वर्ष महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविणारे स्व. वसंतराव नाईक यांची १०९ वी जयंती छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित कृषि महाविद्यालय, कांचनवाडी येथे दि.१ जुलै २०२२ रोजी उत्साहात पार पडली.

संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, महाविद्यालयाचे संचालक/ प्राचार्य डॉ. दत्तात्रय शेळके आणि संस्थेचे मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर यांच्या समवेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर वृक्षारोपण केले. त्यानंतर महाविद्यालयामध्ये स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस हार घालुन आदरांजली वाहिली. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्रा.अतुल भोंडवे व महाविद्यालयाचा विद्यार्थी स्वप्नील नजन यांनी या थोर व्यक्तीविषयी त्यांचे विचार व्यक्त केले.

त्याच बरोबर ग्रामीण जाणीव जागृती कार्यक्रमाअंतर्गत दत्तक घेतलेल्या १८ गावांमध्ये रावेच्या विद्यार्थ्यांनी कृषि दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण केलेच त्याचबरोबर मुरमी, कापुसवाडी, लोहगाव, मुर्शीदाबादवाडी, गणोरी, मांडकी या ठिकाणी शेतकऱ्यांशी विविध माध्यमातून (जसे की चित्रफित सादरीकरण, विषयतज्ञांचे मार्गदर्शन, पथनाटय आणि वेगवगळ्या घोषवाक्याने समृद्ध अशी कृषिदिंडी) संवाद साधला. अशा प्रकारे महाविद्यालयाच्या वतीने कृषि दिन साजरा करण्यात आला. या उत्साहात महाविद्यालयाचे संचालक तथा प्राचार्य डॉ. दत्तात्रय शेळके यांचे मार्गदर्शन लाभले.





# डॉ.नितीन चाटे यांच्या कार्याची राज्य शासनाने घेतली दखल

## डॉक्टर्स-डे निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. नितीन चाटे यांनी आयुष्यमान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जनारोग्य जीवनदायी योजने अंतर्गत केलेल्या कामाची दखल राज्य शासनाने घेतली असून डॉक्टर्स डे निमित्त डॉ. नितीन चाटे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात गौरव करण्यात आला आहे. डॉ. नितीन चाटे हे गेली अनेक वर्षांपासून येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात सर्जरी विभाग प्रमुख म्हणून कार्य करीत आहेत. याच सोबत ते वैद्यकीय महाविद्यालयाच्या आयुष्यमान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जनारोग्य योजनेचे प्रमुख म्हणून काम पहात आहेत. या योजनेचा सर्वसामान्य रुग्णांना अधिक लाभ मिळवून देण्यासाठी डॉ. नितीन चाटे हे गेली अनेक वर्षे प्रयत्न करीत आहेत.

**डॉ.नितीन चाटे यांच्या मुळे सलग ४ वर्षांपासून स्वा. रा.ती.रु.स बहुमान**

डॉ.नितीन चाटे यांच्या नियोजनामुळे व सातत्यामुळेच सदरील महाविद्यालयाच्या हा विभाग गेली चार वर्षे सतत मराठवाडा पातळीवरील प्रथम क्रमांकावर येत आहे. महाविद्यालयाच्या सर्जरी विभागाने सदरील योजने अंतर्गत एप्रिल २०२० ते जून २०२२ या कोरोना महामारीच्या काळात ३००० हुनअधिक शस्त्रक्रिया केल्या बद्दल राज्य शासनाच्या नॅशनल हेल्थ ऍथोरटी विभागाच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले आहे.

सदरील गौरवाबध्दल डॉ. नितीन चाटे यांचे अधिष्ठाता डॉ.भास्कर खैरे, मेडिसीन विभाग प्रमुख डॉ. सिध्देश्वर बिराजदार, आ.नमिता मुंदडा, विधान परीषदेचे माजी आमदार तथा सदस्य संजय दौंड व इतरांनी अभिनंदन केले आहे. राज्य शासनाच्या वतीने गौरविण्यात आलेल्या या प्रमाणपत्रावर नॅशनल हेल्थ ऍथोरटी विभागाचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफीसर सुधाकर शिंदे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

# शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करा

## 'मिशन झिरो ड्रॉपआऊट' मोहिम प्रभावीपणे राबविण्याच्या जिल्हाधिकारी यांच्या सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** शाळाबाह्य व स्थलांतरीत मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करावे व मिशन झिरो ड्रॉपआऊट मोहिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज दिल्या. 'मिशन झिरो ड्रॉपआऊट' मोहिमेचा आढावा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज महसूल सभागृहात घेतला. याप्रसंगी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रमोद सुर्यवंशी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे, उपशिक्षणाधिकारी राजू मडावी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ज्योती कडू, समग्र शिक्षा समन्वयक धनंजय गव्हाणे, अपंग समावेशीत शिक्षणच्या श्रीमती बोरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्ह्यात 5 जुलै ते 20 जुलै 2022 या कालावधीत शाळाबाह्य व स्थलांतरीत मुलांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. याप्रसंगी आढळून येणाऱ्या शाळाबाह्य व स्थलांतरीत मुलांना जवळच्या शाळा अंगणवाडीत दाखल करण्याचे व त्यांना गणवेश तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी शिक्षण विभागाला दिल्या. प्राथमिक शिक्षणापासून कोणी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे त्यांनी सांगितले. शाळा प्रवेशीत मुलांची 100 टक्के उपस्थिती आवश्यक असल्याचे ते म्हणाले. इयत्ता पाचवी, आठवी व दहावी नंतर शाळा सोडणाऱ्या मुलांना पुढील शिक्षण घेण्यासाठी त्यांचे समुपदेशन करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या. शाळा सोडल्यानंतर मुलींचे बालवयात विवाह होऊ नये यासाठी मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याचे व त्यांचे शिक्षण निरंतर सुरू राहील यावर भर देण्याचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सांगितले.

शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करतांना 12 ते 17 वयोगटातील मुलांचे कोरोना लसिकरण होईल यासाठी आरोग्य विभाग व शिक्षण विभाग यांनी आपसी समन्वय साधून कार्यवाही करण्याच्या सूचनादेखील जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिल्या. बैठकीला शिक्षण, महिला व बालविकास, महसूल, अल्पसंख्यांक विभागाचे संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद स्थापना सप्ताह 24 जून ते 3 जुलै 2022 या कालावधीत देशभरात साजरा करण्यात येत असल्याचे म्हटले. संघटनेच्या स्थापनेला यशस्वीपणे 4 वर्षे पूर्ण झाल्याच्या आनंदात पुर्ण देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आंतर्राष्ट्रिय हिंदु परिषदेचे विदर्भ प्रांत प्रभारी व माई ग्रुपचे CMD मोतीलाल चौधरी यांच्या वाढदिवसा निमित्त पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिविर आणि रक्तदान शिविराचे आयोजन मनीषनगर नागपुर येथे नुकतेच झालेत. यामध्ये परिसरातील शेकडो नागरिक सहभागी झाले होते. नेत्र तपासणी शिबिरात सुमारे 250 लोकांनी सहभाग घेतला तर 30 हून अधिक लोकांनी रक्तदान करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आउटर रिंग रोड वर्धा रोड नागपूरच्या माई सिटी प्रोजेक्टमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. AHP विदर्भ प्रांत प्रभारी मोतीलाल चौधरी यांनी केक कापून वाढदिवसानिमित्त रक्तदानाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी एएचपी विदर्भ प्रांत महिला अध्यक्षा अस्मिताताई भट्ट, मायग्रुपच्या संचालक अँड.रुबी चौधरी, सीईओ प्रकाश बघेले, शरद सेलोकर, मुन्ना पटले, निलेश बोपचे, श्रीराम मुडे, भरतसिंघ चौहान, यजेंद्र ठाकूरजी, प्रसाद काठीकर, गोविंदा शेट्टी (संपर्क प्रमुख) संतोष श्रीवास्तव, भरतसिंह चौहान, माणिकचंद पारधी, श्रीराम मुडे, योगेश गायकवाड सरचिटणीस, गिरडकर ताई, दीपक भावसार, मुकुंद उपासने, दिनेश गुल्हाने, श्रीकृष्ण तळेगावकर, शिव पारधी, इंद्रराज तुरकर, सचिन साळवे, सूर्यकांत राजे, अनिल बन्नोर, धनंजय पाटणकर, प्रदीप नाला, जेलाल पटले, श्रीपाद दखने, देवेंद्र गभणे, अनिल मते, यश बघेले, राम कुशवाह, आस्तिक कटरे, श्रिहरि चौधरी, मोतीलाल पटले, किशोर नागदेव, राहुल क्षीरसागर, हरीश कंगाली, मोहन, राजेश लक्षणे, सुभाष पटले, (परनचित्रकार) संजय ठाकरे इत्यादी उपस्थित होते.



# शिक्षणाची हेळसांड आणि शिक्षकांची कुतरओढ



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**शिक्षण मग ते पायाभूत असो अथवा उपयोजित त्यातून उद्याचा विवेकी माणूस घडला पाहिजे ही माफक अपेक्षा असते. कालानुक्रमे शिक्षणाच्या उद्देशात बदल झाला असे म्हटले तरी ज्ञानार्जन, समाजभान निर्मिती, परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य, मानसिक व बौद्धिक कक्षा रुंदावणे, स्वयंशिस्तीतून सामाजिक सौहार्द जपणे, चांगल्या-वाईटाची पारख आणि उदरभरणाची तजवीज ह्या काही सामायिक गोष्टी पूर्वीपासून आजपर्यंत चालत आलेल्या आहेत. आहेत म्हणण्यापेक्षा होत्या असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. कारण आजच्या शैक्षणिक वातावरणाकडे पाहून उदरभरण ही गोष्ट सोडली तर शैक्षणिक पर्यावरणाने बाकीच्या सर्व गोष्टी सोडून दिल्यात जमा आहेत.**

शाळा-महाविद्यालयातील प्रवेशाच्या अनुषंगाने विचार केला तरी विद्यार्थ्यांची मनधरणी करून, पालकांना काही भव्य वगैरे शैक्षणिक सल्ला देऊन त्यांच्या पाल्याने आपल्या शाळेत प्रवेश घ्यावा, यासाठीचा द्राविडी प्राणायाम हा नित्याचा झाला आहे. शैक्षणिक पर्यावरणामध्ये फक्त शिक्षकच येतो असे नाही, पण जबाबदार मात्र त्यालाच धरले जाते ही खंत आहे. गल्लीबोळात अक्षरशः घर भाड्याने घेऊन शाळा चालवली जात असेल तर विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रस्सीखेच होणार हे उघड आहे. शिक्षकानेच विद्यार्थी जमवायचे, परिस्थिती नसेल फीस भरण्याची तर पदरमोड करायची आणि पवित्र वगैरे ज्ञानदानही करायचे. बरे हे सर्व करण्यासाठी, या प्रवाहात येण्यासाठी लाखो रुपये देऊन हे महत्कार्य पार पडायचे हे वेगळेच. शिक्षणाच्या संबंधी कोणत्याच सांख्यिकीय तपशिलात न जाता या व्यवस्थेने फक्त शिक्षकांचे जे वेगवेगळे वीस-पंचवीस प्रकार केले तेही समाज म्हणून आपण समजून घेत नाही. कायम विनाअनुदान धोरणाने अक्षरशः एक पिढी गारद झाली. स्वप्नांच्या झुल्याचे अवकाश विहरण झाल्यानंतर जाग आली तेव्हा गुरुजी सेवानिवृत्त होत असल्याचे कळले. एक व्यवस्था म्हणून आम्ही भारताचे लोक सेवा आणि धंदा यात काहीच फरक केला नाही. भांडवल जमा करून दुकान थाटावे तसे शाळा काढल्या. चालवायला बिनपगारी मुनिमांची फौज तयार होतीच. ज्या देशाला शैक्षणिक धोरण असत नाही ते पोकळ वास्याचं घर असतं. वरून चांगलं दिसत असलं तरी कधी कोसळेल हे सांगता येत नाही. जॉन डुईने डेमोक्रोशी अँड एज्युकेशन या पुस्तकात त्याचे फार सखोल विवेचन केले आहे. आदर्श लोकशाहीसाठी विवेकी, ज्ञानसंपन्न नागरिक तयार होणे आवश्यक असते. शिक्षकांनी स्वतः प्रयोगशील असणे त्यासाठी आवश्यक आहे. जॉन डुईचा हा शैक्षणिक रचनावाद आज शक्य आहे का? आजपर्यंत या पद्धतीचे शैक्षणिक वातावरण आपण का तयार करू शकलो नाहीत. लोकशाही म्हणजे फक्त निवडणुका आणि राजकारण यावरच आपण थांबलो, त्याचा हा परिणाम आहे. लग्नापूर्वी प्रेमावर आणि लग्नानंतर राजकारणावर बोलण्यात आपणांस जी धन्यता वाटते तेवढी धन्यता जीवनाच्या इतर




क्षेत्रांवर बोलण्यात वाटत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ओशोंच्या शिक्षामे क्रांती आणि शिक्षा और विद्रोह या दोन पुस्तकांमधून शिक्षणासंबंधी जो मूलगामी विचार व्यक्त झाला आहे, त्याचे सार म्हणजे आपल्या शैक्षणिक धोरणात आणि वातावरणात आमूलाग्र बदल झाला पाहिजे हाच आहे. एक काळ असा होता की, विद्यापीठातील शिक्षक हा सर्वांत विद्वान, तज्ञ वगैरे असतो, असा एक समज होता. मग तोही साजेसेच गंभीर असायचा. आज परिस्थिती अशी आहे, की ठिकठिकाणी विनाअनुदानित कॉलेजेसची संख्या वाढल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शोधात त्यास बाहेर पडावे लागेल अन्यतः सरप्लसची टांगती तलवार त्यावरही आहेच. त्यामुळे कोण सुपात वा जात्यात आहे याचा हर्ष अथवा शोक न करता सर्व शिक्षणप्रेमींनी एकत्र येऊन विनाअनुदान धोरणास विरोध केला पाहिजे. शिक्षणाचा मूळ उद्देश नोकरीला लागणे हा नसला तरी शिकून उपाशी राहणे, रोजगाराभावी आत्महत्या करण्यापर्यंत कोणास तसे वाटणे हाही उद्देश असूच शकत नाही. स्वामी विवेकानंद म्हणायचे, उपाशीपोटी असलेल्या माणसास तुमच्या तत्त्वज्ञानापेक्षा भाकरीची नितांत गरज असते. शिक्षणाकडून साध्या भाकरीची अपेक्षा ठेवणे काही वावगे ठरू नये. समाजाची शैक्षणिक उदासीनता ही काही काळी जादू केल्यासारखे एका दिवसात तयार झाली नाही. मागच्या वीस-पंचवीस वर्षांपासून हे यथावकाशपणे भिनले आहे. साधारणतः दोन हजारच्या पूर्वीच कलाशिक्षक, शारीरिक शिक्षकांच्या भरती प्रक्रिया शासनाने थांबविल्या. शिक्षणसेवक पद्धतीने त्यावर मोहोर उमटवली. अगदी प्राथमिक ते उच्चशिक्षणापर्यंत सचिव पातळीवरील सुपीक डोक्यातून एकेक अस्त्र बाहेर निघू लागली, तशी शिक्षण प्रक्रियेची अधिकच हेळसांड होण्यास सुरुवात झाली. आपण कोठेही राजकारण करू शकतो या अभिनिवेषापोटी राज्यकर्त्यांनी शिक्षणातही राजकारण आणले आणि वाताहत सुरू झाली. खरेतर वैदिकतेच्या पूर्वीपासून चालत आलेली शिक्षण परंपरा म्हणवून घेत असताना त्याचा वर्तमान पाहून कोणास काही वाटत नाही, याचे सखेद आश्चर्य वाटते. एक शिक्षक अनेक अधिकारी घडवू शकतो पण अनेक अधिकारी मिळून एकही उच्च दर्जाचा शिक्षक घडवू शकत नाहीत, हे सत्य आहे. शेवटी सत्य कोणालाच नको असते. म्हणून तर कदाचित शिक्षकही नको आहे का? असा प्रश्न पडणे साहजिक आहे. व्यवस्थापकांनी एक गोष्ट लक्षात कायम लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे रस्ते, पाटबंधारे वा तत्सम गोष्टी उद्या केल्या तरी तितकासा फरक पडणार नाही. एखाद्या वर्षाचेच नुकसान होईल, पण शिक्षणाभावी काय नुकसान होते ते इथल्या दलित, आदिवासी बांधवांनी भोगले आहे. जेवढे अनर्थ करायचे ते एका अविद्येने केलेलेच आहेत. समाजाला पुन्हा ते परवडण्यासारखे नाही.

## बोंबाबोंब कशासाठी?

**कायम विनाअनुदानित, अंशतः अनुदानित आणि पूर्ण अनुदानित असा कोणताच भेदभाव न करता शासनाने शिक्षकांचे प्रश्न सोडवले पाहिजेत. विद्यार्थ्यांना पकडून आणून शिकवण्यापेक्षा तो स्वतः शाळा-महाविद्यालयात कसा येईल, त्याच्या भविष्यात आपण काय करणार आहोत, त्यास रोजगार मिळणार आहे का? अशी परिस्थिती आपणांस निर्माण करावी लागेल. अंशदायी निवृत्ती वेतनाच्या जंजाळातून शिक्षकांची सोडवणूक आपण करणार आहात का? नवीन पदभरतीकडे डोळे लावून बसलेली कित्येक उच्चविद्याविभूषित मंडळी चाळीशी पार केली आहे. त्यांना आपण न्याय द्यावा. शिक्षण क्षेत्रातील अशा अनेक प्रश्नांच्यासाठी ही शासन म्हणून आपणाकडे आजचा शिक्षक साद घालत आहे.**

# प्रश्न विचारणारा कार्यकर्ता : कॉम्रेड अण्णा सावंत




गुलाब पाटील
संपर्क क्र. 9860725872


आधुनिक केसरी

**सिटू आणि कॉम्रेड अण्णा सावंत यांना कधीच वेगळे करता येणार नाही. व्यवस्थेला प्रश्नच विचारायचे नाही ही भांडवलदारांची मानसिकता. अशा काळात अण्णा सावंत यांनी जालन्यात आधी कामगारांना बोलते केले. त्यांना एकत्र केले आणि आपल्या नैतिक आचरणातून उद्योजकांनाही प्रश्न विचारून बोलते केले. कामगारांना घामाचे दाम मिळवून देण्यासाठी अथक निस्वार्थ प्रयत्न केले. आज राजकीय व्यवस्थेलाही प्रश्न विचारायचे नाहीत अशा काळात अण्णा सावंत यांचे आत्मकथन प्रसिद्ध होत आहे. घामाचा गंध आणि त्याची दरवळ ज्यांनी अनुभवलेली आहे अशा संपादक, विचारवंत उत्तम कांबळे यांच्या हस्ते ३ जुलै रोजी प्रकाशन होत आहे, हा उत्तम योगायोग आहे.**

३१ ऑक्टोबर 1989 ला मी जालन्यात आलो. स्थानिक वृत्तपत्रात संपादकीय विभागात काम करीत होतो. तो काळ निदान मराठवाड्यात तरी शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी यांचे प्रश्न प्राधान्याने मांडणारा होता.  एकूण पत्रकारितेवर मराठवाडा, अजिंठा आणि नंतरच्या काळात लोकमतचा प्रभाव होता.  वृत्तपत्राला संपादकाचा चेहरा असे. खास करून अनंतराव भालेराव यांच्या मराठवाडा दैनिकाची जनमानसावर छाप होती. समाजवादी विचारांचा मोठा प्रभाव होता. अंकाच्या खपातूनच वृत्तपत्र चालत होते. ते जाहिरातयुग नव्हते!  साहजिकच अन्य मोठ्या आणि जिल्हास्तरावरील दैनिके आणि पत्रकारांवर अनंतरावांच्या विचारांचा नैतिक धाक होता. अशा या काळात विद्यार्थी संघटना, शेतकरी शेतमजूर आणि कामगार संघटनांना एक प्रकारे चळवळीचे स्वरूप होते. तत्कालीन संघटना खरोखर न्याय हक्कासाठी लढत. अवैध मार्गाचा पैसा तेव्हा पापासमान होता.  अशा काळात अण्णा सावंत नावाचा एक तरुण शासकीय नोकरी सोडून कामगार चळवळी सहभागी झाला. त्याआधी एएसएफआय या विद्यार्थी संघटनेत त्यांनी काम केलेले होते. त्यातील संघटन कार्याचा त्यांना अनुभव होता. जालन्यातील सीटू (सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन) संघटनेत ते दाखल झाले. जालना हे मुळातच व्यापारी उद्योजकांचे गाव. उद्योजकही कामगारांना परिवारासारखे समजत आणि कामगारही निष्ठेने काम करीत. परंतु प्रत्यक्षात जेवढे काम तेवढे दाम मिळत नसल्याच्या तक्रारी 90 च्या दशकात सुरू झाल्या होत्या. जालन्यात त्याकाळी गेडोर आर. जे.इंडस्ट्रीज, त्रिमूर्ती, गोयल मेटल,सम्राट अशा अनेक कंपन्या होत्या. नंतरच्या काळात स्टील इंडस्ट्रीज वाढल्या. उद्योग वाढले, कामगार वाढले आणि त्यापाठोपाठ शोषणही वाढले!  त्याकाळी मालक म्हणेल ती पूर्वदिशा होती. कारण प्रश्न पोटाचा आणि रोजीरोटीचा होता. मालकांकडे तत्कालीन बाहुबली सुद्धा होते.  त्यामुळे कामगार आपल्यावरील अन्यायाची तक्रार करण्याची हिम्मत करीत नव्हते. अशावेळी अन्य संघटनांप्रमाणेच सिटूच्या माध्यमातून बोटावर मोजता येतील इतक्याच मोजक्या कार्यकर्त्यांच्या जोरावर अण्णा सावंत यांनी कामगारांना मदतीचा हात दिला. त्यांचा आवाज बनवण्याचा प्रयत्न केला. कामगारांच्या सुट्या, सुट्ट्यांचा कापला जाणारा पगार, थकीत पगार, वेळेवर पगार न देणे,संघटनेत सहभागी होणाऱ्याला घरी बसविणे किंवा अवघड कामे देणे, जादा वेळ कामावर ठेवणे, विशेषता दिवाळीचा बोनस न देणे, भविष्य निर्वाह निधी न भरणे वगैरे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाले होते.  यातील गुंतागुंत लक्षात घेणे, मागण्या योग्य की अयोग्य हे तपासणे, केवळ उद्योजकाला अडचणीत आणणे असे उद्योग अण्णा सावंत यांनी केले नाहीत. एकीकडे श्रीमंत भांडवलदार आणि दुसरीकडे सायकलवर चालणारे कामगारांचे नेते अशी स्थिती तेव्हा होती. सुमारे चार दशक उलटूनही अण्णा सावंत यांचा साधेपणा तसुभरही कमी झालेला नाही. स्थानिक वृत्तपत्रात कामगारांचे मोर्चे आंदोलने याच्या बातम्या आम्ही देत असू.  गरिबी अनुभवलेल्यांना गरिबीची जाणीव असते.... त्याच भावनेतून कष्टकरी, कामगारांच्या बातम्यांना वृत्तपत्रात स्थान मिळत होते.
कधी कधी अण्णा सावंत हे गळ्यात शबनम लटकवून कार्यालयात येत होते. कामगारांचे प्रश्न सुटावेत, यासाठी सावंतांची तळमळ लपून राहत नव्हती.  कामगार अधिकारी, कामगार कोर्ट, पोलीस केसेस यातच त्यांचे आयुष्य गेले असावे. त्याचा एक अनुभव मला देखील आलेला आहे. आमच्या प्रतिनिधीने त्यांच्याविरुद्ध एक वृत्त छापले होते.  ज्यातून त्यांची प्रतिमा मलिन होऊ शकत होती. अण्णा सावंत यांनी थेट संपादक म्हणून माझ्यावरच कोर्टात केस दाखल केली होती. त्यांचे म्हणणे खरे होते; पण त्याकाळी वृत्तपत्राकडून सहसा माफी मागितली जात नव्हती आणि माफी मागण्यासारखे वृत्त देखील टाळले जात होते.  कोर्टात तारखा झाल्या. मी जाहीर माफी मागितली नसली तरी त्यांना व्यक्तिगत भेटून माफी मागितली होती. त्यांनाही माझ्यावर विश्वास होता. अखेर प्रकरण संपले. अण्णा सावंत यांचे कामगार चळवळीतील जीवन अत्यंत असुरक्षित होते. पदोपदी धोके होते. नुसते लिहिण्या बोलण्यासारखे हे काम नव्हते. कृतिशील



कॉम्रेड अण्णा सावंत




लोकांचे यश पाहिले जाते, परंतु त्यांच्या यशाचा मार्ग पाहिला जात नाही. त्यांचे जीवन खडतर होते. त्यांनी आपल्या आत्मकथनात सांगितल्याप्रमाणे एखाद्या नदीच्या प्रवाहात उडी मारण्यासारखे त्यांचे जीवन होते.कोठे भौऱ्यात अडकणार, काट्यात सापडणार, गाळात रुतणार की कोणत्या किनाऱ्याला लागणार हे सांगता येत नाही असे होते!  कामगार चळवळीत आयुष्य समर्पित करतानाच त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे काम केले. उजवे विरुद्ध डावे असा संघर्ष होता. उजव्यापेक्षा डावे कडवे होते. डाव्यांची विचारसरणी ही गोरगरीब, उपेक्षितांची मानले जात होती तर उजवे म्हणजे पोट भरलेल्यांचे प्रश्न मांडणारे, हित पाहणारे असे समजले जात होते. डाव्यांमध्ये माकप, भाकप, जनता दल, समाजवादी पक्ष, पुलोद वगैरे असे छोटे छोटे पक्ष होते. जालन्यातील निवडणुकांमध्ये जनता दलातून राधाकिशन लाला हे उमेदवार असताना ते निवडून येईल की नाही ही शंका असतानाच, नव्हे शक्यता नसतानाही एक विचारधारा म्हणून काही लोक,संघटना त्या बाजूने उभे राहत.  यात अण्णा सावंतही अग्रभागी असत. थोडक्यात ते भुकेल्या, उपेक्षितांचे प्रश्न मांडण्यासाठी एखाद्या सैनिका प्रमाणे तयार असत. त्यांच्यासोबत कॉम्रेड मधुकर मोकळे, कावळे, पडोळे, सारंगे, गायकवाड, कांबळे, मुंडे,सुनंदा तिडके  असे निस्वार्थ पदाधिकारी कार्यरत होते. कॉम्रेड उद्धवराव भवलकर, कॉम्रेड भालचंद्र कानगो ही मोठी नावे सिटू मुळेच जालनेकरांना ठाऊक झाली होती. चळवळीतील, म्हणजे संघटनेतील कार्यकर्त्याचे निधन झाले तर त्यांची अंत्यविधीची पद्धत सलामी ठोकणारी होती. त्याचेही वेगळेपण तेव्हा आम्हा नवतरूनाना जाणवत होते. विचाराने, निष्ठेने ही मंडळी पक्की होती. त्याकाळी कामगार नेत्यांचे खून, जबर मारहाण अशा बातम्या येत तेव्हा या कामगार संघटनांच्या नेते कार्यकर्त्यांबाबत सर्वांनाच काळजी वाटत होती.  कॉम्रेड अण्णा सावंत यांचे कार्य आजही गरीब, उपेक्षित, आदिवासी, दलित, कष्टकरी समाजासाठी पथदर्शक आहे. पैसे मिळाले की सभेला जाणारे, गुत्तेदारीचे काम मिळाले तरच काम करणारे, मतलबासाठी होल्डिंग लावणारे, जाहिरात मिळाली तरच बातमी देणारे अशा स्वरूपाचे त्या काळात कार्यकर्ते नव्हते आणि नेतेही तसे नव्हते.   आता संघटना, पक्ष हे एकूण चित्रच बदलले आहे. चळवळी राहिल्या नाहीत. त्या मोडून काढल्या जातात. धार्मिक, जातीय उन्माद वाढलेला आहे. सत्तेसाठी राजकारण होत आहे. प्रश्नच विचारायचे नाहीत, अशा राजकीय काळात कायम प्रश्न विचारणाऱ्या कॉम्रेड अण्णा सावंत यांच्या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. तरुणांनी हे आत्मकथन जरूर वाचले पाहिजे. त्यातून संघर्ष आणि श्रमाचा सुगंध मिळाल्याशिवाय राहणार नाही.


हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# “ख़ुशियों की मंज़िल ढूँढी तो ...”

आधुनिक केसरी

**गुरु दत्त... गुरु, जो स्वतःच एक तरल काव्य होता, कादंबरी होता, एवढंच नाही तर उगवणाऱ्या पहाटेसारखा एक शाश्वत सत्य होता तो! आपल्या आयुष्याचा कॅनव्हास फार कमी वेळात शेकडो रंगांनी चितारला होता त्याने! त्यासाठी बाजारात मिळणारे कुठलेही रेडिमेड रंग त्याने वापरले नाहीत, ब्रशही त्यानेच निर्मिलेले आणि कॅनव्हासही त्यानेच बनविलेला.**




‘ये महलों, ये तख़्तों, ये ताजों की दुनियाँ...’ ‘प्यासा’ चित्रपटातलं हे गाणं जेव्हा जेव्हा माझ्या कानी पडतं तेव्हा तेव्हा रफीच्याही आधी मला आठवतो तो गुरु दत्त! ‘प्यासा’ हा काही मनोरंजन पट नव्हता, तर एका दृश्य कलाकृतीतून या बेगडी समाजाच्या दांभिकतेवर मारलेले चाबकाचे फाटकारेच होते ते! कलात्मकतेने फिल्माकित केलेल्या या चित्रपटाचं कथानक जेवढं हटके होतं तेवढंच प्रश्नांच्या वादळात समाजाला गिर गिर फिरवणारंही होतं. पैसा आणि प्रसिद्धीच्या मागे धावणारा, प्रसंगी मढ्यावरचं लोणी खाणारा हा समाज, आणि एका हळुवार मनाच्या कवीची दास्ताँ ‘प्यासा’ मध्ये टिपण्यात गुरु दत्त प्रचंड यशस्वी झालेयेत. कधी कधी तर वाटतं, या चित्रपटातील ती शोकांतिका; गुरु दत्त च्या खऱ्याखुऱ्या आयुष्यातील तर नव्हती ना?
आणि ज्या मूडमध्ये साहिरने,
**‘जवानी भटकती है बेजार बनकर**
**जवां जिस्म सजते है बाज़ार बनकर**
**जहाँ प्यार होता है व्यापार बनकर**
**ये दुनियाँ अगर मिल भी जाये तो क्या है?...’**
हे गाणं लिहिलंय, हा मूड साहिरला त्याच्या खऱ्याखुऱ्या आयुष्यातून मिळाला होता कि काय?... वास्तवाच्या निखाऱ्यातून फुटलेली, ही गाणी त्याशिवाय का एवढ्या ताकदीने कागदावर उतरली असतील?

गुरु दत्त... गुरु, जो स्वतःच एक तरल काव्य होता, कादंबरी होता, एवढंच नाही तर; उगवणाऱ्या पहाटेसारखा एक शाश्वत सत्य होता तो! आपल्या आयुष्याचा कॅनव्हास फार कमी वेळात शेकडो रंगांनी चितारला होता त्याने! त्यासाठी; बाजारात मिळणारे कुठलेही रेडिमेड रंग त्याने वापरले नाही, ब्रशही त्यानेच निर्मिलेले आणि कॅनव्हासही त्यानेच बनविलेला. आयुष्यातली एक भूमिका साकारताना आपली दमछाक होते, नृत्याच्या नानाविध अदा देहात भरलेला हा अदाकार मात्र दिग्दर्शक, निर्माता, लेखक आणि अभिनेता या चारही अंगकलांनी समर्थपणे व्यक्त होत राहिला.

गुरुची ओळख दिल्याशिवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा इतिहासच पूर्ण होवू शकत नाही. या महान फनकाराचा जन्म ०९ जुलै १९२५ रोजी कर्नाटक राज्यातील पादुकोण येथे, एका चित्रपूर सारस्वत ब्राम्हण कुटुंबात झाला होता. त्याचं जन्म नाव - वसंतकुमार शिवशंकर पादुकोण! हा पादुकोण परिवार; मुळचा कारवारचा. गुरुचं बालपण कोलकत्याच्या भवानीपूर मध्ये गेलं. वयाच्या सोळाव्या वर्षी १९४१मध्ये प्रख्यात गायक उदय शंकर (मा. रवि शंकर यांचे बंधू) यांच्या ‘इंडिया कल्चर’ या नृत्य अकादमीत प्रवेश घेवून त्याने परफॉर्मिंग आर्टचे मूलभूत प्रशिक्षण घेतले. कलकत्त्यातील एका सारस्वत ब्राम्हण मेळाव्यात नृत्य सादर करुन बक्षीस मिळवलेल्या या कलाकाराने, सुरवातीला ‘लिव्हर ब्रदर्स’ या कंपनीत टेलिफोन ऑपरेटरची नोकरी सुद्धा केली होती.

एकोणीसशे चौऱ्हेचाळीसमध्ये कुटुंबासोबत गुरु मुंबईला आला. पुढे, आपल्या काकाच्या ओळखीने पुणे येथील ‘प्रभात फिल्म’मध्ये नृत्य दिग्दर्शक म्हणून तीन वर्षांच्या करारावर त्याने नोकरी पकडली. या ठिकाणी गुरुची ओळख देव आनंद आणि रेहमान या दोघा फनकारांशी झाली. जे पुढच्या आयुष्यात त्याचे चांगले मित्र झाले. याच दरम्यान ‘चाँद’ चित्रपटात श्रीकृष्णाची भुमिका साकारल्यानंतर, १९४५ला ‘लखारानी’मध्ये गुरुनं नायकाचं काम केलं. १९४६ला मात्र एल. संतोषी यांच्या ‘हम एक है’साठी सहाय्यक दिग्दर्शकाची धुरा त्याने सांभाळली. ‘प्रभात फिल्म’चा करार संपल्यावर मात्र गुरु नऊ दहा महिने बेकार होता. या रिकाम्या दिवसांत ‘एलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया’ या इंग्रजी साप्ताहिकासाठी तो छोट्या छोट्या कथा लिहीत असे.

चित्रपटसृष्टीत गुरूचा सितारा अजून चमकायचाच होता. या काळात नवीनच स्थापन झालेल्या देव आनंदच्या ‘नवकेतन’ फिल्म्सच्या बॅनरखाली दिग्दर्शक म्हणून गुरुचा पहिला चित्रपट होता १९५१चा ‘बाजी’! देव आनंद अभिनीत हा चित्रपट हिट झाला होता. या चित्रपटात, ‘तदबीर से बिगड़ी हुयी तक़दीर बना ले...’ गाणारी गीताबाली फारच मोहक दिसली. ‘बाज’ चित्रपटाच्या वेळी १९५३ला गुरुने आपल्या स्वतःच्या प्रॉडक्शन हाऊसची ‘गुरु दत्त मुव्हीज प्रा. लि.’ची स्थापना केली. देव आणि गुरु मध्ये असा करार झाला होता की, गुरुने जर एखाद्या चित्रपटाची निर्मिती केली तर, त्या चित्रपटात नायकाची भुमिका देव साकारेल. आणि देव जर एखादा चित्रपट बनविणार असेल तर, गुरु दिग्दर्शकाचं काम सांभाळेल. या करारानुसार देवने गुरुला ‘बाजी’ दिला आणि गुरुने देवला ‘सी.आय.डी.’! गुरु-देवच्या या जोडीने पुढे आणखी काही चांगले चित्रपट दिले असते, पण चेतन आनंद मुळे त्यांच्यात मतभेद झाले. वहिदा रेहमानला चित्रपटसृष्टीत आणण्याच्या श्रेयाबद्दल, जॉनी वॉकरला नायकाच्या समांतर भुमिकेसह रफीच्या आवाजाचं कोंदण देवून, चाहत्यांना हटके अशी सुंदर गाणी द्यायचं श्रेय सुद्धा गुरुचंच आहे.

एकोणीसशे चोपन्नाला गुरुचा ‘आरपार’आला आणि गुरुचं ‘गुरु’पण सिद्ध झालं. ‘ये लो मैं हारी पिया...’ ‘बाबुजी धीरे चलना...’, ‘अरे न न न न तोबा तोबा...’ काय ती ‘आरपार’ची अफलातून गाणी! त्यातली शामासोबतची गुरुची लडिवाळ तकरारही मस्तच वाटली. मजरूहची लेखणी, गीता दत्तचा आवाज आणि ओ.पी.चं कर्णमधुर संगीत या त्रयींची जादू, त्या काळी रसिकांवर गारुड घालू लागली होती. ‘आरपार’ ब्लॉकबस्टर ठरला. या नंतर गुरुने आणखी एक संगीतमय हिट ‘मिस्टर अँड मिसेज ५५’ दिला. पण या वेळी मात्र त्याची नायिका होती चुलबुली मधुबाला. ‘थंडी हवा, काली घटा....’ आणि ‘जाने कहाँ मेरा...’ रातोरात हिट झाली. ‘जाने कहाँ मेरा...’ या गाण्यातली विनिता भट सोबतची जॉनीची मिश्किल मेलोडी ऐकता-बघताना चाहते तर आजही वेडे होतात.

गुरुने निर्मिलेला १९५६चा हिट थ्रिलर ‘सी. आय.डी.’ हा तर कुणालाच विसरता येणार नाहीये. हिंदी चित्रपटसृष्टीच्या सोनेरी पानांवर चिरंजीव झालेली यातली सुरेल गाणी रसिक आजही ओठांवर मिरवताहेत. गुरुचं आयुष्य बदलणारी वहिदा, ‘सी. आय.डी.’त पहिल्यांदा दिसली होती.

चित्रपटांचं फिल्माकन गुरु अतिशय कौशल्याने करीत असे, अभिनेत्यापेक्षा त्याच्यातल्या दिग्दर्शकाचं पारडं जड होतं. आणि १९५७ला आलेल्या ‘प्यासा’ ने ते सिद्धही केलं. समाजाने नाकारलेल्या एका कवीची, विजयची कहानी अतिशय तरलतेने गुरुने यामध्ये फिलमांकित केलीये. ‘प्यासा’ ही अभिजात कलाकृती आजही अभ्यासली जाते ते वेगवेगळ्या कारणांसाठी! यातील, ‘हम आपकी आँखों मैं...’, ‘जाने क्या तूने कहीं...’ आणि सर जो तेरा चकराये...’ ही गाणी जबरदस्तच आहे. या चित्रपटात वहिदाने साकारलेली ‘गुलाबो’ निव्वळ अप्रतिम आहे. ‘प्यासा’ने गुरुला एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवलं. यातलं, ‘जाने वो कैसे लोग थे जिनके, प्यार को प्यार मिला...’ हे गाणं म्हणजे गुरुच्या अंतरीची वेदनाच होती. आणि त्या गाण्यातल्या,
‘खुशियों की मंज़िल ढुंढी तो, ग़म की गर्द मिली
चाहत के नग्मे चाहे तो, आहे सर्द मिली...’ या ओळी म्हणजे त्याचा स्वतःचाच आयुष्यपट होता जसा काही!

‘कागज के फुल’ १९५९साली आलेली आणखी एक बेमिसाल कलाकृती! एका नायिकेच्या प्रेमात पडलेल्या दिग्दर्शकाची ही गाथा! चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला आणि गुरु अक्षरशः उद्ध्वस्त झाला. पैशांची मोठी गुंतवणूक तर होतीच, त्यापेक्षा स्वतःतल्या क्रिएटिव्ह दिग्दर्शकाचं अपयश गुरुच्या जिव्हारी लागलं होतं.

‘वक्त ने किया क्या हसीं सितम...’ आणि ‘अरे देखी जमाने की यारी...’ ही गाणी आजही ऐकतो तेव्हा माझ्या डोळ्यांत आसवं उभी राहातात. या अपयशाने गुरु आतून असा काही खचला की, त्याने ठरवूनच टाकलं - या पुढे तो कोणत्याही चित्रपटाचं दिग्दर्शन करणार नाही. मात्र त्या नंतर लगेचच, १९६०ला गुरुनेच निर्मिलेल्या ‘चौदहवी का चाँद’ने त्याच्या उदास रात्रीत चार चाँद लावत तीन फिल्मफेअर पुरस्कारांवर आपली मोहोर उमटवली. रफ़ीने गायलेल्या त्याच्या शीर्षक गीताचे आजही लाखों दिवाने आहेत. त्याचा ‘साहिब, बीबी और गुलाम’ तर मी आता आता म्हणजे, पहिल्या लॉकडाऊनच्या काळात बघीतला. मीनाकुमारीने साकारलेली यातली छोटी बहू जितकी लाजवाब आहे, तितकीच वहिदाने उभी केलेली जबां सुद्धा मनभावन आहे.

गुरुने निर्मिलेला हा चित्रपट म्हणजे कला, इतिहास आणि सृजनाचा सुंदर मिलाफ आहे. ‘पिया ऐसो जिया मां...’ इतकंच; या चित्रपटातलं ‘भंवरा बड़ा नादान है...’ आणि मीनू मुमताजला मिळालेलं ‘साक़िया आज तुझे नींद नहीं आयेगी...’ ही गाणं सुद्धा तेवढीच क़त्ल करणारी आहेत. भारतातर्फे ऑस्करसाठी निवड झालेल्या या चित्रपटाला फिल्मफेअरचे चार पुरस्कार मिळाले होते.

‘सांझ और सवेरा’च्या वेळी गुरुने हृषीकेश मुखर्जी सोबत सुद्धा काम केलं होतं. १९६६ला आलेला ‘बहारें फिर भी आयेगी’ हा गुरुचा शेवटचा चित्रपट. आपल्या परिवाराच्या विरोधाला न जुमानता गुरुने १९५३ला पार्श्वगायिका गीता रॉय (गीता दत्त) हिच्याशी लग्न केलं होतं. तरुण, अरुण आणि नीना ही त्यांची तीन मुलं! गुरुच्या भावाच्या, आत्मारामच्या म्हणण्यानुसार ‘आपल्या कामाच्या बाबतीत गुरु हा कठोर शिस्तप्रिय होता पण आपल्या वैयक्तिक आयुष्यात, याच्या अगदी विरोधी भुमिका त्याची राहिली.’ वहिदा रेहमानच्या नात्यामुळे दोघा नवरा-बायकोत वाद झाले होते. अशातच गुरुने, धुम्रपान आणि मद्य जवळ केलं. मुंबईतील पेडर रोड येथील भाड्याने घेतलेल्या घरात, गीता दत्तपासून वेगळा झालेला गुरु, १० ऑक्टोबर १९६४ला पलंगावर मृतावस्थेत सापडला होता. ही आत्महत्या होती की अपघाताने ते सगळं घडलं या बद्दलचा संभ्रम आजही मिटलेला नाही. असं म्हणतात की गुरु दारुमध्ये झोपेच्या गोळ्या मिसळत होता. त्याच्या अकाली जाण्याने साधना या अभिनेत्रीसोबत येणारा त्याचा ‘पिकनिक’ हा चित्रपट अपूर्णच राहिला. पुढे, १९७२ला वयाच्या एक्केचाळीसाव्या वर्षी गीता दत्तचंही मद्याच्या अतिसेवनामुळे निधन झालं.

एकोणीसशे पन्नास आणि साठच्या दशका दरम्यान कलात्मक आणि व्यावसायिक दृष्ट्या यश मिळवणाऱ्या राज कपूर, मेहबूब खान, बिमल रॉय या दिग्दर्शकांपैकी गुरु एक होता. मूड टिपण्यात आणि छाया-प्रकाशाचा अप्रतिम मेळ जुळवून आणण्यात गुरुचं निर्विवाद प्रभुत्व होतं. ‘टाईम’ या अतिशय प्रतिष्ठित आणि नावाजलेल्या मासिकाने गुरुच्या ‘प्यासा’ या चित्रपटाला चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट शंभर चित्रपटांमध्ये नामांकन दिलेलं आहे. आशियाई चित्रपट निर्मात्यांमध्ये गुरु हा आठव्या स्थानावर समजला जातो.

हा अष्टपैलू फनकार आता या जगात नसला तरी उगाचच वाटून जातं, त्याचा अंतरात्मा; आपल्या मनातल्या ‘शांती’ला आजही शोधत असेल का? सांजेच्या समईसारख्या त्याच्याही काळजात तेवतच असतील ना तिच्या आठवणी? आणि त्या जेव्हा मनात फेर धरत असतील तेव्हा कैफींनी लिहिलेल्या -
**‘बेक़रार दिल इस तरह मिले**
**जिस तरह कभी हम जुदा न थे**
**तुम भी खो गये, हम भी खो गये**
**एक राह पर चल के दो क़दम**
**वक़्त ने किया क्या हसीं सितम...’** या ओळी तर त्याला आठवत नसतील?

**संदर्भः विकिपिडीया, यु-ट्युब, IMDB.**

## मला भावलेली सिनेरत्न



मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236

## गंध दरवळे माती

गंध दरवळे माती ।
थेंब पावसाचे आले ।।
धन्य झाली धरामाय ।
मन तिचे आनंदले ।। धृ ।।

1ढोल आभाळात वाजे ।
वाजे वाऱ्याची पिपाणी ।।
वरात आली पावसाची ।
बघा नटली अवणी ।।2।।

चैत्र वैशाखाचं ऊन ।
धरा तप्त तहानली ।।
थेंब वळिवाचे येता ।
कशी सुखावुनं गेली ।।3।।

सर बरसे जोमानं ।
नाचे रानामंधी मोर ।।
पिकं भिजलं शेतात ।
जिवा बळीराजा घोर ।।4।।

गारा पडल्या टपोऱ्या ।
मना मोहून त्या गेल्या ।।
लग्नात धरा पावसाच्या ।

कुणी अक्षदा फेकल्या ।।5।।

उन्ह कोवळं दाटता ।
मेळ सप्तरंगी झाला ।।
सोहळा सृष्टीचा पाहण्या ।
रथ देवाजीचा आला ।।6।।

तरुवेली स्तब्ध सारी ।
पक्षी पावसात न्हाली ।।
खण हिरवा लेवून ।
आज धरीत्री हसली ।।7।।

-मनिष आहिरे




## बाप

दाखवत नाही कधीच तो
किती करतो माया
बाप म्हणजे वटवृक्षाची
शितल अशी छाया

कर्ता असतो घराचा
असतो खरा आधार
हसत घेतो खांद्यावरती
परिस्थितीचा भार

कुटुंबासाठी रात्रंदिवस
कष्ट मात्र करत असतो
अंतर्मनातील वेदनेने
क्षणोक्षणी मरत असतो

तरीसुद्धा दुःख त्याचे
कधीच कुणा सांगत नाही
चंदना परी झिजून सुध्दा
कधीच काही मागत नाही

रक्षण करण्या कुटुंबाचे
झेलतो पाऊस वारा
बाप म्हणजे मुलांसाठी
योध्दाच असतो खरा

पोरकेपणाची जाणीव होते
बाप सोबत नसताना
फक्त त्याचे मोल जाणा
तो जिवंत असताना

-ऋषिकेश सुरवसे
रा.संभाजी नगर, सोनपेठ.
मो.८४११९४७९९६

## संवाद ज्ञानोबा तुकयाचा




समस्त ज्ञानासी असशी तूच पाया
तूच ज्ञानराया, तुका म्हणे
केले तुवां खुले ज्ञानाचे भांडार
हर्ष अपरंपार होई लोका.

थोर तुझा महिमा
काय मी वर्णावा
निःशब्द हा तुका ज्ञानदेवा.

दावियली लोकां ऐसी शब्दकळा
फुलविला मळा अमृताचा
सोसुनी प्रहार लोकनिंदेचे
बोल अमृताचे प्रसवले.

गीतेचा तो अर्थ
सांगे ज्ञानेश्वरी
दिव्य ती वैखरी अमृताची.

म्हणे ज्ञानराजा ऐक ऐक रे तुकया
माझिया सखया भूलोकीच्या
रचियली तुवां अभंगाची गाथा
भाविक तो माथा टेकतसे.

रूढी परंपरा, दंभ अभिमान
व्यर्थ ते लक्षण भाविकांचे
दावियला तुवां भक्तिमार्ग लोका

धन्य माझा तुका बोले ज्ञानदेव.

काळावरी तरले तुझे ते अभंग
धरूनिया संग श्रीहरीचा.

असे मी जरी पाया
तू झालासी कळस
आली देवळास
अलौकिक शोभा.

तुका म्हणे ज्ञानराजा
आता वंदितो चरण
न करी वर्णन
आणिक माझे.

साक्षी तया दोघा
इंद्रायणी पार
सोन्याचा पिंपळ डुलतसे.

धन्य इंद्रायणी, धन्य चंद्रभागा
कृपा पांडुरंगा झाली तुझी.

-विश्वास देशपांडे,
चाळीसगाव मो. ९४०३७४९९३२

## आजकाल...

आजकाल मी फारसे लिहीत नाही
कारण मी सारख्या बातम्या बघतो

आजकाल मी इथे तिथे जात नाही
कारण मी घरातल्या घरात दमतो

आजकाल मी नीट श्वासही घेत नाही
कारण सारखा मास्क लावून बसतो


आजकाल मी फारसा बोलतही नाही
कुणीही काहीही बोललं तेव्हढ ऐकतो

आजकाल मी फारसा हसत ही नाही
कारण मी स्वतःवरच रुसलेला असतो

आजकाल मी सोशल मीडियावरही नसतो
कारण मी स्वतःशीच बोलत बसतो

आजकाल मी स्वतःचे सुध्दा ऐकतो
म्हणूनच मी घरातल्या घरात घुसमटतो!

-डॉ विजय पांढरीपांडे




## "घनश्यामल बरसले"



अंग अंग शहारलेले
पाण्यासवे लोचनही भिजलेले
असा कसा अवचित आलास रे
रोमारोमात घनश्यामल बरसलेय रे....!

मुग्ध मेघ दाटून आले
स्वन पाहावे की देखावे दृश्यातले
नाचण्यात आसमंत दंग झालाय रे
इंद्रधनू सप्तरंगात न्हाऊनि निघाला रे....!

लावुनिया पंखपाचू गवत हिरवळले
सांगताना गुपित मन माझे गहिवरले
दव प्राशन करून मखमल फुले बहरली रे
काजळ लावुनिया घनश्यामल बरसलेय रे....!

फुलवूनी पिसारे मयुर चिंब झाले
तृषार्त चातक जल पिऊनीया उमलले
मनामनात श्वासासहीत गंध दाटलाय रे
आभाळी गर्जून नभ तुडुंब भरलेय रे....!

-प्रदीप बडदे,
नवी मुंबई, मो. 9594027995

**तुकारामनीती**
**भाग 15**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण...

आधुनिक केसरी

**तुकाराम नीती ! संत तुकोबाराय अशी काही नितीतत्वे संबंध मानवजातीला सांगून गेले कि; आजही त्यांचा प्रत्येक शब्द ना शब्द मार्गदर्शक ठरतो आहे. मानवाचे जीवन अखंड विचारावरच चालत आले असून विचारच सज्जन आणि दुर्जनांना कृतींना जन्म देत असतो. एक विचार वाल्या कोळ्याचा वाल्मिक ऋषी करून रामायणासारखी महान कलाकृती निर्माण करू शकतो किंवा एका विचाराने डाकू अंगुलीमाल सारखा क्रूर डाकू सज्जन होऊन महात्मा बुद्धाचा अनुयायी होतो. याच अनुषंगाने प्रस्तुत अभंगात तुकोबाराय सहजतेने उपदेश करतांना आपणास जागे करून जातात.**

**आंधळ्यासि जन अवघे चि आंधळे ।**
**आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥1॥**
**रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न ।**
**तोंडासि कारण चवी नाहीं ॥2॥**
**तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण ।**
**तया त्रिभुवन अवघें खोटें ॥3॥**
**(शा.अ.गाथा अ.क्र. 302)**

याच आशयाच्या अनेक म्हणी आणि वाक्प्रचार बोलीभाषेत रूढ असून त्या मानव जागृतीचे काम करत असतात. "जशी दृष्टी तशी सृष्टी" ही म्हण समाजात नित्य प्रचलित आहे.

माणसाचा विचार किती महत्वाचा असतो? विचार म्हणजे आपल्या हातातील सुगंधी फुलांप्रमाणे असतात जे आपल्याबरोबर आपला भोवताल सुगंधी करून जातात. याच आशयाचे

**अञ्जलिस्थानि पुष्पाणि वासयन्ति करद्वयम् |**
**अहो सुमनसां प्रीतिर्वामदक्षिणयोः समा |**

हे संस्कृत सुभाषित आपल्याला सांगून जाते कि; ओंजळीतील फुले जशी दोन्ही हातांना सुगंधित करतात. तसे फुलांसारखे, सुंदर अन्तःकरण असणार्यारचे प्रेम हे डाव्या उजव्या हातावर सारखेच असते. आपला श्वास आणि विचार हे किती मौल्यवान असतात ? याचे हे सुंदर उदाहरण आहे. याच संदर्भाने संत सुद्धा चांगुलपण आणि वाईटपणा याविषयी लिहितात,

**बुरा जो देखन मैं चला, बुरा ना मिलिया कोई॥**
**जो दिल खोजा आपना, मुझसे बुरा ना कोई॥**

आपण जगाकडे कशा नजरेने पाहतो ( ?) हे आपल्यावर अवलंबून आहे. आपण लोकांमध्ये चांगुलपण पाहत असू तर आपल्याला जग चांगलेच दिसणार आणि उलट आपण जर जगाकडे वाईट भावनेने पहिले तर जग आपल्याला वाईटच दिसणार ! त्यासाठी एकदा श्रीकृष्णांनी भर सभेमध्ये असतांना दुर्योधनाला त्या सभेतून सज्जन माणूस शोधून आणायला सांगितले आणि युधिष्ठिराला दुर्जन माणूस शोधून आणण्यास सांगितले. दोघांचे अनुभव भिन्न होते. त्याच सभेत दुर्योधनाला एकही सज्जन माणूस सांपडला नाही तर दुसरीकडे युधिष्ठिराला एकही दुर्जन माणूस सांपडला नाही. यावरून हे स्पष्ट होते कि, आपली दृष्टी कशी आहे ? त्यामुळेच तुकोबाराय आंधळ्या माणसाचा दृष्टांत देऊन त्याला संपूर्ण जग हे आंधळेच असणार, कारण त्याला स्वतःला दृष्टी नाही. त्याला काय उपयोग दुसऱ्याच्या दृष्टीचा ? त्याच बरोबरीने तुकोबा रोगी माणसाचा दाखला देऊन "रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं", रोग्याला मिष्टांनाची काय चव कळणार ? ताप आलेल्या रोग्याला तुम्ही केशर-बदाम घातलेले दुध दिल्यास त्याला ती कडू लागते, कारण त्याच्या अंगात ताप उतरलेला आहे. अगदी याच न्यायाने "तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें" जर माणूस स्वतःच शुद्ध नसेल तर त्याला अवघे विश्व खोटे अथवा अशुद्ध वाटायला लागते. ज्याच्या शरीरात ताप त्याला दुध कडू आणि ज्याच्या मनात पाप त्याला संपूर्ण जग पापी अथवा खोटेच भासणार !

तुकोबांचा हा भंग किंवा या आशयाचे शेकडो अभंग माणसांना विचार करायला लावतात. "अंगी ज्वर तया नावडे साखर । जन तो इतर गोडी जाणे" असे वैविध्याने परिपूर्ण अभंग तुकोबांनी लिहिले असून त्यांचा गाथा हा सर्वकाळ समाजाच्या मार्गदर्शनाचा अविभाज्य अंग बनला आहे. तुकाराम नीती हे सदर लिहितांना मला संत तुकोबांच्या अभंगांचे माणसाच्या दैनिक जीवनात मोलाचे स्थान आहे हेच विषद करावयाचे आहे. आज आपण सगळेजण धावपळ करत आहोत. परंतु या धावपळीत मुख्य



विचार बाजूला राहता कामा नये ? आपल्या प्रत्येक कृतीत मनुष्य केंद्रस्थानी असला पाहिजे आणि बाकीच्या सर्वच बाबी ह्या कडेने असल्या पाहिजे. आज माणसांकडे सर्व सुविधा आहेत, पण सुख-शांती-समाधान आहे का ? याचे उत्तर देणे मोठे अवघड आहे. तेंव्हा कोणत्याही अवघड प्रश्नांची उत्तरे शोधणे किंवा काही अवघड विचार करणे, वाचणे यापेक्षा सर्व प्रश्नांची उत्तरं समाधानकारक हवी असतील तर आपण सर्वांनी सद्सद्विवेक बुद्धीने तुकोबांचा गाथा हाती घेतला पाहिजे. त्याचे वाचन, चिंतन, मनन आणि त्या प्रमाणे आचरण झाल्यास माणसाची सर्वच संसारिक दुःखं कमजोर होतील यात शंका नाही!

तुकोबांचा गाथा वाचने म्हणजे शंभर नंबरी सोने गाठीशी ठेवण्यासारखे आहे. हा मानवतेच्या मुलभूत सुधारणांसाठी मांडलेला अनुभूतीपूर्ण विचार असून याच विचारात संपूर्ण मानवजातीचे कल्याण सामावलेले आहे. परंतु दुर्दैवाने हा गाथा आणि त्यातील अनमोल विचार तत्वे विशिष्ट शिक्का मारून बंदिस्त होत आहेत ! हे घातक आहे ! तुकोबा हे एक महान अनुभवपूर्ण आणि कृतीशील समाजसुधारक होते. ते फक्त वारकरी नव्हते, तर त्यांच्या समोर संसाराच्या दुःखाने दबलेली-पिचलेली माणसं होती. त्यासाठी काल आज आणि उद्या सुद्धा तुकोबांचे हे अभंग-विचार समस्त मानवजातीला पथदर्शी असून अपना सार्वांनीच त्याचे अवलोकन करणे अगत्याचे आहे. आज हा अभंग लिहिण्याचे कारण म्हणजे माणसांनी स्वतः शुद्ध-सात्विक विचारांची कास धरावी. इथला प्रत्येक माणूस हा डोळस झाला पाहिजे. प्रयेक व्यक्ती तन-मनाने निरोगी झाला पाहिजे. शुद्ध-सात्विक माणूसच उद्याचे शुद्ध-सात्विक आणि सद्विचाराने ओतप्रोत भरलेले विश्व निर्माण करू शकतो. तेंव्हा, चला आपण सर्वजण आपल्यातील शुद्धवृत्ती वृद्धिंगत करूयात आणि आपले विश्व आनंदाने भरून टाकूयात! आपल्या जीवनाचा अंतिम उद्देश हा निर्भेळ-शुद्ध-सात्विक आनंदप्राप्ती हा असून तो स्वतःसह आपल्या भोवती सुद्धा पेरून उद्याचा आनंदी समाज निर्माण करूयात! असे झाले तरच खऱ्या अर्थाने या तुकाराम नीतीचे सार्थक होणार आहे ! जय तुकोबाराय !

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# कुटुंबाचे माहात्म्य चित्रपटाद्वारेही

आधुनिक केसरी

**नेटफ्लिक्सवर 'मेघनादवध रहस्य' (बंगाली) पाहिला. वेगळंच गूढ कथानक आहे. प्रसिद्ध लेखकाच्या आयुष्यात घडलेल्या घटना आणि इतिहासाशी सांगड. सव्यसाची चक्रवर्ती मुख्य भूमिकेत आहे. प्रसिद्ध लेखक श्रीमंत वयस्कर डॉ. असिमोव बोस हे कम्युनिस्ट विचारांचे असतात. तरुण पत्नी सिनेमात ॲक्टिंग करत असते. निकम्मा पुतण्या घरातला हरकाम्या होऊन गेलेला असतो. एके दिवशी अचानक लेखकमहाशय घरातून गायब होतात. त्यांचा मित्रपरिवार, कुटुंब, विद्यार्थी, प्रकाशक, समीक्षक या सगळ्यांची पोलिस चौकशी सुरू करतात. ४५ वर्षांपूर्वीच्या घटना प्रकाशात येतात आणि रहस्य उलगडते. कुटुंबावर संशय घेतला जात असला तरी अखेरीस कुटुंबातल्या व्यक्तीच लेखकाच्या पाठीशी उभ्या राहून त्यांचं निर्दोषत्व दर्शवण्याचा प्रयत्न करतात.**

बंगाली सिनेमांमध्ये परमव्रत चटर्जी सध्या खूपच वरच्या स्थानावर आहे, दिग्दर्शक व अभिनेता म्हणूनही. त्याचे सिनेमे मनोविकार, त्यांची कारणे, परिणाम, पोषक परिस्थिती यांवर भाष्य करणारे असतात. त्यांत आधुनिक जग व त्यातली माणसे यांचे बारकाईने चित्रण केलेले आहे. इंग्रजी सबटायटल्समुळे छान समजतात. उदा. शोनार पहार, समांतरल, मयूराक्षी, मंदबासार गल्प. रुख (दिग्दर्शकः अतनु) या सिनेमात मनोज वाजपेयीची भूमिका छोटी असली तरी लक्षात राहते. स्मिता तांबे, इला भाटे व इतर आणखीही मराठी कलाकार आहेत. ध्रुव या टीनेजरची मनःस्थिती, मानसिकता, विचार करण्याची पद्धत आणि नंतर कळलेली वस्तुस्थिती या बाबी परिणामकारक मांडल्या आहेत. या सर्वच चित्रपटांत कुटुंबसंस्थेचे वादातीत महत्त्व अधोरेखित होते.

दीप्ती नवललिखित व दिग्दर्शित 'दो पैसे की धूप चाराने की बारिश' हा एक वेगळाच सिनेमा नेटफ्लिक्सवर पाहिला. अगदी बांधून ठेवणारा तर आहेच, पण कथा नेहमीपेक्षा जास्त भावणारी असल्यामुळे खूप आवडून गेला. शिवाय सर्वच प्रसंगांमध्ये खास दिग्दर्शकीय (काव्यमय तरी व्यवहार्य) अशी दृष्टी जाणवली, जी कलावंतांनी




अगदी नीटच पोचवली, त्यामुळे अधिकच पटला. रजित कपूर, मनीषा कोईराला यांच्याबरोबरीने (छोटा मुलगा) सनाज नवलही चांगला अभिनेता आहे. स्त्रीने शरीर वापरून काही मिळवू पाहणं हा मार्ग तिला पुरुषांच्या गुलामीकडे नेतो. स्त्री म्हणून आत्यंतिक वेगळी वागणूक देणाऱ्यापासून दूर राहावे ! COMPROMISES असतातच, पण त्यांचा BASE निखळ प्रेमच आहे, हे विशेषतः छोट्या मुलासाठी आणि पर्यायाने आईसाठीही महत्त्वाचे आहे !! मिलिंद सोमणचे घूमजाव MORAL POLICING मुळे होत असेल तर तो पाहीलच काय कसं करता येईल ते, पण रजित कपूरसाठी प्रेमच काय ती संपूर्ण FAMILY असते आणि त्याचे करियरमधले यशसुद्धा त्याला खुणावत असते !!! जगण्यातले अपुरेपण अटळ नसते, जो तो आपापली उत्तरे शोधत असतो...SHARING व CARING असणारी माणसे आहेत हे मोलाचे, त्यांचे नाते कोणते हे दुय्यम ठरते ! किंबहुना तीच खरी FAMILY, जी एकमेकांसाठी केव्हाही काहीही करायला तयार असते !! शेवटी एक वाक्य येतं, ' LOVE IS BEING WITH THEM WITH WHOM YOU SHARE YOUR INCOMPLETENESS ' !!! या निष्ठुर जगाने नाकारलेली तीन माणसे एकत्र येऊन आपले खास विश्व तयार करण्यात यशस्वी होतात, आनंदी जगतात !



दीप्ती नवललिखित व दिग्दर्शित 'दो पैसे की धूप, चार आने की बारिश' या सिनेमात एका UNCONVENTIONAL RELATIONSHIP चं LOVELY FAMILY मध्ये अगदी नकळत कसं रूपांतर होतं, हे जरूर पाहण्यासारखं आहे !! नेटफ्लिक्स व यूट्यूब दोन्हीवर हा उपलब्ध आहे !!!

# राजकारणाच्या बातम्या ऐकून बोअर झाले असाल तर हे वाचा

आधुनिक केसरी

नॉर्वे हा युरोपमधील एक देश आहे. तिथे कधीही जाईन हे दृश्य सहसा सापडेल. एक रेस्टॉरंट आहे. एक महिला त्याच्या कॅश काउंटरवर येते आणि म्हणते- "5 कॉफी, 1 सस्पेशन".. मग ती पाच कॉफीचे पैसे देते आणि चार कप कॉफी घेऊन जाते. थोड्या वेळाने दुसरा माणूस येतो, म्हणतो- "4 LNCH, 2 सस्पेंशन"!!! तो चार लंचसाठी पैसे देतो आणि दोन लंच पॅकेट घेऊन जातो. मग दुसरा येतो आणि ऑर्डर देतो - "10 कॉफी, 6 सस्पेंशन" !!!

तो दहासाठी पैसे देतो, चार कॉफी घेतो. थोड्या वेळाने जर्जर कपडे घातलेला एक म्हातारा काउंटरवर येऊन विचारतो- " येणी सस्पेडेड कॉफी??" उपस्थित काउंटर-गर्ल म्हणते- "येस !!" आणि त्याला एक कप गरम कॉफी देते. काही वेळाने दुसरा दाढीवाला माणूस आत येतो आणि विचारतो- "एनी सस्पेंड लंच??" त्यामुळे काउंटरवरील व्यक्ती गरम अन्नाचे पार्सल देते आणि त्याला पाण्याची बाटली देते.

आणि हा क्रम... एका गटाने जास्त पैसे मोजावेत आणि दुसऱ्या गटाने पैसे न देता खाण्यापिण्याचे पदार्थ घ्यावेत असा दिवस जातो. म्हणजेच, अज्ञात गरीब, गरजू लोकांना स्वतःची "ओळख" न घेता आणि कोणाचा चेहरा "नकळता" मदत करणे ही नॉर्वेजियन नागरिकांची परंपरा आहे. आणि ही "संस्कृती" आता युरोपातील इतर अनेक देशांमध्ये पसरत असल्याचे सांगण्यात आले. आणि आम्ही हॉस्पिटलमध्ये केळी, किंव्हा आपण रुग्णांना एक संत्री वाटली तर ते सर्व मिळून त्यांच्या पक्षाचा, त्यांच्या संघटनेचा ग्रुप फोटो काढून वर्तमानपत्रात छापतील. हो की नाही??? अशीच "सस्पेंशन" सारखी खाण्या-पिण्याची प्रथा भारतात सुरू करता येईल का???

**सागर पागोरे**
**संपर्क क्र. 98506 07818**



# सिंध डाक सेवा.. भारतातील पहिले टपाल तिकीट




सुधीर कोर्टीकर
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**१ जुलै १८५२ साली भारतातील पहिले टपाल तिकीट निघाले. १ जुलै २०२२ साल आहे. या ऐतिहासिक घटनेला आज १७० वर्षे झालेली आहेत. जगात पहिले टपाल तिकीट इंग्लंड मध्ये निघाले. इंग्लड मधिल सनदी अधिकारी रोलँड हिल यांनी इंग्लंडच्या राणीला अशा प्रकारची ही टपाल तिकीटे काढून सरकारला खूप मोठा महसूल मिळू शकतो ही संकल्पना मांडली. मग इंग्लंडच्या राणीनी परवानगी दि ल्यावर ४ मे १८४० साली इंग्लंडच्या राणीच्या परवानगीने जगातील पहिले टपाल तिकीट निघाले. इंग्लडच्या राणीचा मुखवटा असणारे हे काळ्या रंगाचे १पेनी किंमतीचे चौकोनी आकाराचे जगतिल पहिलें तिकीट होते.**

रोलॅंड हिल या सनदी अधिकाऱ्यांच्या बरोबर काम करणारा दुसरा सनदी अधिकारी होता बार्टल फ्रेरे. या बार्टल फ्रेरे यांची बदली व सिंध प्रांतात झाली. आज पाकिस्तान मध्ये असणाऱ्या सिंध प्रांतात या बार्टल फ्रेरे यांनी १ जुलै १८५२ साली गोल आकाराचे लाल रंगाचे भारतील पहिले टपाल तिकीट काढले. लाल रंगागाचे सिंध डाक सेवा म्हणून काढलेले हे भारतातील पहिले टपाल तिकीट हे लाखेचे होते. या गोल आकाराच्या तिकिटात सिंध डिस्टीक डाक व EIC (इस्ट इंडिया कंपनी) असे लिहिलेले होते. हे तिकीट लाखेचे असल्याने त्यावर शिक्का मारताना ते तुटू लागले. त्यानंतर ती तक्रार दूर करीत तोच मजकूर असलेले
पांढऱ्या रंगाचे एम्बॉसिंग असणारे तिकीट काढले. मात्र हे पांढरे तिकीट लिफाफ्यावर.. पाकिटावर लावलेले आहे की नाही हे पोस्टमनला रात्रीच्या पलीत्याच्या उजेडात समजतं नाही अशा तक्रारी वारंवार आल्याने मग तसेच टपाल तिकीट हे निळ्या रंगांमध्ये काढले. १८५२ साली निघालेली भारतातील लाल, पांढऱ्या, निळ्या रंगाची सिंध डाक सेवा नावांनी ओळखली जाणारी सगळी टपाल तिकीटे १८५४ साला पर्यंत चालली.
बार्टल फ्रेरे या ब्रिटिश सनदी अधिकाऱ्यानी ही टपाल तिकीटे सिंध प्रांतात सुरु केलेली होती. त्यांच्या एका ब्रिटीश अधिकाऱ्याने इंग्लंडच्या राणीला लेखी तक्रार केली. बार्टल फ्रेरे यांनी सिंध प्रांतात टपाल तिकीटे सुरु केलेली आहेत... पण त्यावर आपल्या राणीचा



म्हणजे आपला फोटो.. आपली मुद्राच छापलेली नाही. तेंव्हामात्र इंग्लंडच्या राणीला खूप खूप राग आला. इंग्लडच्या राणींनी १८५४ साली सिंध डाक सेवा त्वरित बंद करून टाकली. मग राणीची मुद्रा.. मुखवटा असणारी चार टपाल तिकीटे ही नव्यानी छपाई करून काढण्यात आली. अर्धा आता, एक आणा, दोन आणे व चार आणे किंमतीची राणीचा मुखवटा असणारी टपातिकिटांची मालिका प्रसिद्ध करण्यात आली. हीच भारतातील पहिली टपाल तिकीटे होत.
माझे वर्गमित्र किशोर चांडक (सोलापूर) हे भारतातील सर्वात मोठे टपाल तिकीट संग्राहक आणि दुर्मिळ नाण्यांचे भारतातील सर्वात मोठे संग्रहाक आहेत. त्यांच्या संग्रहात भारतातील पहिल्या टपाल तिकीटांची ही मालिका त्यांनी उपलब्ध करून दिलेली आहे. किशोर चांडक हे सोलापूर मधील एक नंबरचे बांधकाम व्यावसायिक असूनही अनेक सामाजिक संस्थांनां आजवर लाखों रुपयांची मदत केलेलीं आहे... नेहमीच अशी मदत ते करीत असतात.
राजा शिवछत्रपतींचे सुवर्ण होण आज भारतात केवळ दहा बाराच अस्तित्वात आहेत. असे शिवरायांचे सुवर्ण होण देखील किशोर चांडक यांच्या संग्रहात आहेत. किशोर चांडक यांनी सोलापूर विद्यापीठाला अगणीत लाखों रुपये किंमतीची जुनी दुर्मिळ नाणी अशातच भेट म्हणून दिलेली आहेत. किशोर चांडक म्हणजे दुर्मिळ नाणी.. दुर्मिळ टपाल तिकीटे.. दुर्मिळ दस्तावेज.. दुर्मिळ वस्तूंचे आपल्या संपूर्ण महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचेच वैभव आहेत. किशोर चांडक हे माझे वर्गमित्र जरी असले तरी ते माझे नाणे नी टपाल तिकीटे याक्षेत्रातील माझे गुरु देखील आहेत याचा मला सार्थ अभिमान वाटतो हे बाकी खरं...




# प्रचंड राग येणं म्हणजे आपल्या मनात अनेक दिवसांपासून साठलेला तणाव प्रकट होणं



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवनात तणावाचे व्यवस्थपान करण्यामध्ये आपण यशस्वी झालो तर मनात रागाचा संचय निर्माण होऊ शकत नाही. हे वास्तविक सत्य आहे. आपल्याला अधुनमधुन प्रचंड अनावर होणारा राग येत असतो. तो येण स्वभाविक आहे आणि हा प्रचंड राग एकाएकी येत नाही, तर तो अनेक दिवसांपासून आपल्या मनात एक प्रकारचा वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने जो तणाव संचय निर्माण झालेला असतो. त्याच रूपांतर रागात होत असत.**



वास्तविक जीवनात सुख-दुःख हे समीकरण असतं. आणि व्यक्ती कोणीही असला तरी जीवनातील सुख-दुःख यापासून सुटका कोणालाही शक्य नाही. तरी सुद्धा दैनंदिन अनेक विषयांच्या अनुषंगाने आपल्या मनात सकारात्मक आणि नकारात्मक विचार निर्माण होत असतात.वारंवार निर्माण होणारे नकारात्मक विचार हे तणावात रूपांतर करत असतात आणि हळुहळू निर्माण होणाऱ्या या तणावाचे शेवटी प्रचंड रागात रूपांतर होते. म्हणजे राग हा कुठल्याही प्रकारचा असो एका क्षणात निर्माण होत नाही. तो निर्माण होतो टप्याटप्प्याने आणि याच वेळी आपण नेमकं दुर्लक्ष करतो. आणि यावेळी जर आपण ही परिस्थिती ओळखु शकलो तर मग मात्र आपण प्रचंड अशा येणाऱ्या रागा पासुन स्वतःला वाचवु शकतो. यासाठी दैनंदिन नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. आहार, दैनंदिन व्यवस्थित संवाद, वाचन, अध्यात्मिक वाचन खुप महत्वपूर्ण आहे. तेंव्हाच दैनंदिन आपण अगदी तणाव मुक्त राहु शकतो. आणि पर्यायाने तणावमुक्त राहिलो तरच आपली सुटका प्रचंड अशा येणाऱ्या या रागापासुन होऊ शकते. म्हणजे जीवनात येणारा प्रचंड राग आणि त्यामुळे होणार आपलं प्रचंड नुकसान थांबु शकत. त्याचे आपल्या जीवनावरील विपरीत परिणामही आपण कुठं तरी नियंत्रित करू शकतो. म्हणून तणावमुक्ती ही खूप आवश्यक आहे. आणि आपण ती नक्कीच करू शकतो. त्यासाठी आपण कितीही व्यस्तता असली तरी दिवसभरात शरिरासाठी साधारणतः एका तसाचा वेळ आपण दिलाच पाहिजे. जेणेकरून निर्माण झालेला थोडा तणाव त्याच दिवशी संपुष्टात येईल. तसेच संवाद म्हणजे एक आठवड्याच्या दरम्यान आपल्याला मानसिक स्थैर्य मिळेल, मन शांत होईल असा संवाद झालाच पाहिजे. संवाद हे तणावमुक्तीचे अगदी सुयोग्य साधन आहे. आपण ज्या व्यक्तिशी संवाद साधल्या नंतर मनाला हलकं वाटलं मन शांती मिळाली तर अशा व्यक्तींसोबत अंहकार बाजुला ठेवून आवश्यकतेनुसार वैचारिक संवाद साधला पाहिजे.
जसे काही शब्द आपल्या कानावर पडताक्षणी आपणास आपण तणावमुक्त झाल्यासारखे आपल्याला वाटत असतं. आणि त्यामुळे निर्माण होणारा तणाव त्याचे रागात होणार रुपांतर जगीच संपुष्टात येत असत. तसंच दैनंदिन जीवनात वाचन, मग ते काही पण वाचा. पण वाचन आवश्यक आहे आणि त्यातल्या त्यात अध्यात्मिक वाचन केले तर उत्तम आहे. आणि या पद्धतीने आपण आपल्या जीवनात निर्माण होणारा शारिरिक-मानसिक तणाव कमी करू शकतो. आणि पर्यायाने त्याचे रागात होणार रुपांतर आपण नक्कीच थांबवु शकतो. ज्ञानाने आपण पुर्ण शांत-स्थिर जीवन जगु शकतो. रागावर कायमस्वरुपी मोठ्या प्रमाणात विजय मिळवु शकतो !!

# रंग वारीचे



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

**रामरावांच्या घरी वारीची परंपरा. पिढीजात आलेल्या खड्या, गोड आवाजात सुंदर अभंगानी पूर्ण वातावरण कसं भक्तीमय करणारे रामराव निस्सीम विठ्ठलभक्त... लहानपणापासून रामराव त्यांच्या आजोबा, नंतर वडीलांबरोबर... नित्यनेमाने वारी करीत. आता मात्र वयोपरत्वे वारी होईनाशी झाली. काय करावे ? कसं करायचं ? कोण आपल्याला नेणार ? माझ्यानंतर कोण वारी पोहोचवणार, त्यांचा मुलगा शिकून मोठा झाला आणि परदेशी स्थिरावला होता... वारी कशी पोहचावावी?**



बायको पण आता थकली. ....मला कोणीच मदतीला नाही. वारीसाठी कोण मदत करेल. त्यांच्या मनातून, डोक्यातून वारी हा विषय जात नव्हता. मनातल्या मनात अखंड धारा बरसत होत्या. काहीच इलाज सापडत नव्हता. ज्येष्ठ महिना संपत आला... आषाढ शुद्ध प्रतिपदा आली तरी काहीच मार्ग सापडत नव्हता... नशिबाला आणि शरिराला दोष देण्या व्यतिरिक्त काहीच करु शकत नव्हते...
विचार करून डोकं, मन दोन्ही देखिल शिणले... डोळा लागला... स्वप्नात मायबाप पांडुरंग रखुमाई मंदिर दिसू लागले... वारीची गजबज, प्रदक्षिणा मार्ग विठू माऊलीच्या नामघोषाने न्हाऊन निघाला... भक्तीचा महासागर लोटला होता. अष्टगंध बुक्याचा, तुळशीफुलांचा घमघमीत वास सगळीकडे दरवळत होता... गर्दीच्या महापूरातुन वाट काढीत रामराव देवळात पोहचले... आलास का रामा मी तुझीच वाट पाहत होतो... तुझ्यासाठी ही विणा आणि तुळशीची माळ तुला देण्यासाठी तुझी वाट पाहत होतो... मला माहीती होतं... तुला यंदापासून वारीला यायला जमणार नाही ते... अरे रडू नकोस! मीच येतो तुझ्याकडे पुढिल वर्षी... तोपर्यंत ही ठेव तुझ्याकडे असू दे ! रामराव डोळेभरून देवाकडे पाहत होते... देवानं विणा आणि तुळशीची माळ हातात ठेवली... तेवढ्यात "रामराव ओ रामराव, !! अहो, अहो उठा उठा !" अश्या हाका कानावर ऐकू येत होत्या...
रामराव उठले... जानकी बाई सांगत होत्या. पलिकडच्या गल्लीतला विठ्ठल आला आहे. त्यांने पंढरपूरचा प्रसाद म्हणून तुमच्यासाठी विणा आणि तुळशीची माळ आणली आहे... विठ्ठलने त्यांच्या हातात विणा आणि तुळशीची माळ ठेवली तेव्हा रामराव त्याच्याकडं बघतच राहिले... तेच रुप...तोच जगदिश्वर... परमात्मा... मायबाप... साक्षात... पांडुरंग... उभा राहिला... आणि म्हणत होता आजोबा पुढच्या वर्षी तुमच्यासाठी पांडूरंग रखुमाईची मोठी मुर्ती घेऊन येतो बर का...
पण त्या बदल्यात तुम्ही मला अभंग म्हणायला शिकवाल का ?... रामरावांनी मान डोलावली नकळत दोन्ही हात जोडून... आणि "पंढरीचा राणा उभा भक्त काजा ॥ उभारोनी भुजा वाट पाहे" हा अभंग म्हणायला सुरुवात केली...
**रामकृष्ण हरी...**

# महाराष्ट्रात घडवलेले सत्तांतर आणि भारतीय जनता पक्ष



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**जे लोक काँग्रेस संस्कृतीत वाढले आहेत, ज्यांनी पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन कायम ठेवले आहेत, ज्यांना राजकारण एक व्यवसाय, आणि फक्त कमाईचे साधन म्हणून राजकारणात आलेले लोकच भारतीय जनता पक्षाच्या निर्णयावर बोट दाखवतात. टीका करतात. एक जुनी गोष्ट आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक जागतिक परिषदेसाठी भारताचे पहीले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे गेले होते. त्या परिषदेला येताना सर्व देशांच्या प्रमुखांनी आपापल्या देशातील विचित्र आणि विषारी प्राणी बंद काचेच्या सिलंडरिक बरणी मधून घेऊन यावेत आणि त्या प्राण्याची वैशिष्ट्ये सर्वांना सांगावित असे ठरले होते. चिन ड्रेगॉन घेऊन आला. कोणी कोब्रा, कोणी नाग असे वेगवेगळे प्राणी बंद बरण्यांमधून आणले होते. सर्व देशांचे प्रमुख गोल मोठ्या टेबल वर बसले होते आणि या प्राण्यांच्या बरण्या मध्यभागी ठराविक अंतरावर ठेवल्या होत्या. नेहरू भारतीय वेळे नुसार उशिरा पोहोंचले आणि आपली बरणी सर्वांसमक्ष त्या मधल्या टेबल वर ठेवली. त्या बरोबर सर्व राष्ट्रप्रमुख खाडकन उठून हॉलच्या बाहेर पळायला लागले. नेहरूंनी सर्वांना थांबवले आणि उठून जाण्याचे कारण विचारले.**

ते लोक म्हणाले आपने आपका पॉट बंद करके नही लाया है. अगर ये जहरिले प्राणी है तो आप ऐसे कैसे खुला लासकते है. नेहरू हसले शांतपणे म्हणाले आप सब अपनी अपनी सीट पर आरामसे बैठीयेगा. वे कुच्छ नही करेंगे. आणि नेहरूंनी सर्वांना सांगितले की हे इंडियन खेकडे आहेत. विषारी आहेत परंतू ते या बरणीचे बाहेर येणार नाहीत. कारण एक वरती चढायचा प्रयत्न करू लागला की दुसरा त्याला खाली ओढतो. कोणीही वर येऊ शकणार नाही. ही भारतीय संस्कृती आहे.

हीच पध्दत काँग्रेस ने नेहरूंचे काळापासून रुजवण्यास सुरूवात केली होती, जी आजही अस्तित्वात आहे. दुसऱ्याचं भलं झालेलं कोणालाच पहावत नाही. पण याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांची राजकीय शाखा भारतीय जनता पार्टी अपवाद आहे. उगाच कांहीही घडले की याचे पंख छाटले, याला डावललं असले कॉमेंट्स सुरू होतात. नितीन गडकरी किंवा आता देवेंद्र फडणवीस यांचे पक्षाने पंख छाटले, ते आता जास्त उडू शकणार नाहीत याची पक्ष श्रेष्ठी काळजी घेत आहेत. हे सरासर झूट आहे. नरेंद्र मोदी, राजनाथसिंह, अमित शाह, नितीन गडकरी, हेच श्रेष्ठी आहेत. या सर्वांना माणसं सांभाळण्याची कला अवगत आहे. कारण हे सर्वजण संघ स्वयंसेवक आहेत. सुसंस्कारित आणि सूज्ञ तसेच अत्यंत मोठ्या मनाचे, खुल्या अंतःकरणाचे आहेत. जर राजनाथसिंह काँग्रेस संस्कृतीतून आलेले असते तर कदाचित त्यांनी 2013 साली नरेंद्र दामोदरदास मोदी यांचे नांव 2014 च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रचार प्रमुख म्हणून, आणि नंतर पंतप्रधान पदाचे दावेदार म्हणून पुढे आणलेच नसते. संघ संस्कार नसते तर मोदींपेक्षा जेष्ठ असणाऱ्या भाजप नेत्यांनी मोदींना स्विकारलेच नसते.

आज कोणताही भाजप उच्चपदस्थ नेता नरेंद्र मोदी, अमित शाह, नितीन गडकरी, राजनाथसिंह, योगी आदित्यनाथ, यांना स्पर्धक म्हणून विरोध करायला उभा नाहीये. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात कितीही मोठे झाले तरी ते शीर्षस्थानी असलेल्या नेत्यांना आव्हान देणार नाहीत हे सर्व जाणून आहेत. देवेंद्र जी सुध्दा सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांतदादा पाटील, पंकजा मुंडे यांना साईड ट्रॅक करणार नाहीत. प्रत्येकाची भूमिका आणि



प्रत्येकाची जबाबदारी ठरलेली असते. नितीन गडकरी आज एक नंबर चे काम करत आहेत, त्यांच्या खात्यात किंवा निर्णयात मोदी आणि शहांनी दखल घेतलेली कधी कोणी ऐकली आहे काय? ही दुष्ट विचारसरणी भाजपात कधीच रूजू शकत नाही. कारण प्रत्येकाला ज्ञात आहे की राष्ट्र सर्वोतोपरी.

परवा शरद पवार साहेबांनी उपरोधिक का होईना पण सत्य सांगितले की नागपूर किंवा दिल्ली चा आदेश कोणी टाळू शकत नाही. हे खरे आहे. मोदींनी फोन केला आणि पक्षाध्यक्ष जगत प्रकाश नड्डा आणि अमित भाई शाहांनी ट्वीट करताच देवेंद्र जी उपमुख्यमंत्री झाले. त्यांना त्यांचा रोल, त्यांची जबाबदारी, आणि पक्षाची त्यांच्या कडून असलेली अपेक्षा बरोबर कळते. मध्यंतरी उगाच पंकजा मुंढे ताईला उचकावण्याचे प्रयत्न खडसे वगैरे करत होते पण पंकजा ताई चांगले ओळखते या नतद्रष्टांना. आज देवेंद फडणवीस यांच्या राज्यसभा आणि विधान परिषदेचे निवडणूकीतील कर्तुत्व त्यांना मोठे करून गेले. म्हणून त्यांचे पाय हवेत नाही उडत ते जमिनीवर घट्ट रोऊन उभे आहेत. एकनाथ शिंदेंना ठरवून विचारपूर्वक बळ देण्यात आले आहे. ते ही निर्णयक्षम आणि समजदार आहेत. त्यांनाही राज्यासाठी काम करायचे आहे. ते देवेंद्र फडणवीस यांच्या अनुभवाचा, प्रशासनावरील पकडीचा उपयोग करून घेताना सर्व शिकुण घेतील. मुख्य हे आहे की हे दोघेही विकासाभिमुख सरकारचे नेते आहेत. त्यांना आपल्याला महाराष्ट्रासाठी काय काय करायचे आहे याची चांगली जाण आहे. आरे कारशेड ची जमीन जी मेट्रोसाठी वापरायला उध्दव ठाकरे आणि विरोधक विरोध करीत आहेत त्यामागची कारणे जाणून घेतल्यावर खरे कळेल सर्वांना. पर्यावरणाचे नावाखाली ती जमीन बेभाव विकण्याचे षडयंत्र चालू होते. तसेच गावोगावच्या एसटी बस स्थानकाच्या जागा हडप करण्याचा प्लॅन चालू होता, त्याला आता खिळ बसणार आहे. सरकार टिकवणे आणि उत्तम कारभार करून मुंबई महापालिका आणि पुणे, पिंपरी चिंचवड या महापालिका जिंकायच्या आहेत. आणि 2024 च्या निवडणुकीत देशात आणि राज्यात भाजपला आणि युतीला परत निवडून आणायचे आहे. ही जबाबदारी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस टीमवर आहे.

त्यामुळे सर्वंकष विचार करून, लांबचे प्लॅन डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रात सत्ता बदल झाला आहे. उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेला अजिबात धक्का लागणार नाही. देवेंद्र फडणवीस काय किंवा इतर कोणीही प्रादेशिक नेता, केंद्रीय पातळीवरील नेता मोठा झाल्याने शीर्षस्थानी असलेल्या नेत्यांचे अजिबात नुकसान होणार नाही. उलट पक्षात सक्षम नेत्यांची दुसरी, तिसरी फळी तयार होईल. जी भाजपाला वर्षानुवर्षे सत्तेवर ठेऊन देशाची, राज्याची प्रगती करील.

# क्रिमिनल्स इन युनिफॉर्म



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**आपल्या दैनंदिन भावविश्वाच्या पलिकडे असे जग आहे, जिथे सतत काही ना काही घडत असते. नवीन उलथापालथ होत असते. घटना घडल्यानंतर त्याचा आढावा प्रसारमाध्यमांद्वारे घेऊन आपण पुन्हा आपल्या कामांकडे वळतो. वरवरचं दिसणं सोड़लं तर अंतर्गत घडामोडी किती खोलवर परिणाम करतात, त्यात नाहक कसे बळी कसे पडतात हे जाणून घेणे गरजेचे आहे.**

संजय सिंग आणि राकेश त्रिवेदी हे दोन्ही लेखक ज्येष्ठ गुन्हे शोध पत्रकार असून यांनी शोध पत्रकारिता करून अनेक हाय प्रोफाइल्स गुन्हे उघड़कीस आणले आहेत. या लेखकद्वयींचं पहिलं पुस्तक 'तेलगी स्कॅंम' खूप गाजलं. या पुस्तकाच्या यशानंतर आता हे लेखकद्वयी वाचकांसाठी रोमांचक, थरारक अशी कहाणी घेऊन आले आहेत. 'क्रिमिनल्स इन यूनिफार्म' ही कादंबरी चित्तथरारक अशी खाकी वर्दीची कहाणी आहे. मूळ कादंबरी हिंदी भाषेत आहे. त्याचा मराठी अनुवाद मुकुंद कुळे यांनी केला आहे.


कादंबरीतील कथानक मुंबई परिसरात घडतं. कादंबरीचं निवेदन तृतीयपुरुषी असून पात्रांच्या संवादातून कथानक आणखी रंजक होत राहते. कादंबरीची सुरवात होते एका ब्रेकिंग न्यूजने. भारतातील सगळ्यात श्रीमंत आसामी कुबेर. कुबेरच्या घराबाहेर म्हणजे कुबेरियाबाहेर एक स्फोटकांनी भरलेली बेवारस गाडी आढळते आणि तिथून सुरु होतं थरारनाट्य. या प्रकरणी पोलीस दल, बॉम्बशोध पथक, मीडिया सगळे जमा होतात. ही केस पाहण्यासाठी १७ वर्षापूर्वी पोलीस दलातून निलंबित केलेल्या सहाय्यक पोलिस निरीक्षक यतिन साठेला पाचारण केले जाते. आणि त्याला CIU चा प्रमुख केले जाते. या प्रकरणाची चौकशी एटीएस, एनआयए, मुंबई पोलिस या सर्वाकडून सुरु होते. एक प्रकारे त्यांच्यात स्पर्धा सुरु होते. कथानकातील प्रसंग वर्तमानातून भूतकाळात पुन्हा वर्तमानात अशा पद्धतीने घटनांची मांडणी केलेली आहे की, वर्तमानातील घटनेचा भूतकाळाशी असलेला संबंध अधोरेखित होते. आणि कथानक जसजसे पुढे जात राहते तसतसे अनेक गोष्टीचा उलगडा होतो आणि वाचकांची उत्कंठा वाढत राहते.

या गाडी प्रकरणात आणखी एक प्रकरण घड़तं ते म्हणजे हसमुख जैन हत्या प्रकरण. या प्रत्येक घटनेनंतर साठेच्या संशयास्पद हालचाली सगळ्यांच्या नजरेत येतात. खरेच या सगळ्यामागे यतिन साठेचं नियोजन होतं का ? हे करून त्याला काय मिळणार होतं ? का यामागे खरा सूत्रधार कोणी वेगळा आहे ? ही अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. या पुस्तकात अनेक सरकारी यंत्रणा, सुरक्षा यंत्रणा याविषयी उल्लेख आहे. या यंत्रणांच्या कामकाजाची, नियोजनाची माहिती यातून कळते. कादंबरीत अनेक पात्रे प्रसंगानुरुप भेटतात. मुंबई पोलीस आयुक्त महावीर तोमर हा अत्यंत महत्त्वाकांक्षी अधिकारी. त्याने आपल्या पदाच्या जोरावर वसुलीतंत्र सुरु केलेलं असतं. तोमर आपल्या पदाचा ग़ैरवापर करुन कसे खेळ खेळतो आणि इतरांना अडकवतो पण खरे क़ाय आहे ? या प्रकरणाचा सूत्रधार कोण ? या गुन्ह्यामागील नेमका हेतू कोणता ? तो सूत्रधार सापडतो का ? हे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचायला हवे.

एखाद्या गुन्ह्यामागे कसे नियोजन केले जाते, आणि आपल्या हाताखालील व्यक्तीचा प्याद म्हणून कसा वापर केला जातो ? आणि प्रकरण अंगाशी आल्यावर स्वतःची कातड़ी वाचवण्यासाठी कसे दुसऱ्याला उध्वस्त केलं जातं, हे वास्तव यात मांडले आहे. पोलीस दलात 'क्रिमिनल्स इन यूनिफार्म' ही टीम कोण तयार करते, हा प्रश्न उद्भवतो. ही केस कशा पध्दतीने सोडवली जाते, त्यामागची प्रक्रिया कशी असते, हे वाचताना एखादा चित्रपटाची कथा वाचतोय की क़ाय असे भासते. एक प्रकारचं थ्रिल या द्वारे अनुभवता येतं. या पुस्तकाद्वारे कोणत्याही यंत्रणेला बदनाम करण्याचा हेतु नाही. पण काही व्यक्तिमुळे संपूर्ण यंत्रणा कशी बदनाम होते, यांवर प्रकाश टाकणारी ही कादंबरी आहे.

या कादंबरीत यतीन साठे सोबतच सतत उल्लेख येतो तो गुन्हे शोध पत्रकार संजय त्रिवेदी याचं. तो ही या प्रकरणातील दुवे कसे दुवे शोधतो, हे समजते. यातील बाकीची पात्रे गृहमंत्री सरदेशपांडे, कुबेरचा मुख्य सुरक्षारक्षक अमन चौधरी, निवृत्त पोलीस अधिकारी दिलीप वर्मा, एटीएसचा प्रमुख पलांडे, पोलीस निरीक्षक नित्या, आर्य, रोहतगी, जितेंद्र नागपुरे, महेश भोर, शिक्षा भोगणारा पोलीस गजानन झेंडे, कुबेर, कुबेरचा मुलगा ध्रुव, संचिनी, नीना डायस या सगळ्या पात्रांचं एकमेकांशी असलेलं कनेक्शन जाणून घेण्यासाठी ही रोमांचक आणि थरारक कादंबरी नक्की वाचा.

लेखकद्वयी यांना गुन्हे शोध पत्रकारितेचा ४० वर्षाचा अनुभव आहे. अनेक प्रकरणं त्यांनी जवळून अनुभवली आहेत. अनेक प्रकरणं मिडियासमोर आणले आहेत. त्या निरीक्षणातून, कामाच्या अनुभवातून या कादंबरीची निर्मिती झाली. या कादंबरीच्या आकृतिबंधामुळे ही कथा त्यांना विस्तृतपणे आणि रंजकतेने वाचकांसमोर आणता आली. कादंबरी नक्की वाचा आणि अनुभवा 'कहाणी खाकी वर्दीची'.



# वाचवू आता वसुंधरेला



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

आधुनिक केसरी

**वृक्ष असे आरोग्यदायीनी, महत्व त्याचे ओळखूनी, एक तरी झाड लावूनी, वृक्षसंवर्धन करुया मनापासूनी**

**पावसाळा सुरू झाला की सर्वत्र वृक्षारोपण करण्यासाठी तयारी सुरू होते. प्रत्येक जण आपापल्या घराभोवती झाडे लावून घराची आणि निसर्गाची शोभा वाढवतात. तर शासकीय कार्यालयासभोवती वृक्षारोपण करण्यात येते. आता मानवाला वृक्षांचे महत्त्व समजू लागले आहे. कारण निसर्गाचा कोप त्याने अनुभवला आहे.**

पुर्वीचा काळ थोडा वेगळा होता. शिक्षण जास्त नसल्यामुळे विचार करण्याची कुवत कमी होती. त्याकाळी झाडांचे महत्व फार कमी होते.
पण घनदाट जंगले होती. त्यामुळे मानव झाडांचा उपयोग इंधन म्हणून करत होता. झाडांची अमानुषपणे कत्तल व्हायची. चंदनाच्या झाडांची तर तस्करी व्हायची. खूप प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले. पाऊस न पडल्याने शेतात पिक कमी पिकू लागले.
परिणामी अन्नधान्य टंचाई भासू लागली. लोकांना पिण्यासाठी पाणी मिळेनासे होऊ लागले नद्या, नाले विहीरी आटू लागले. निसर्गाचा कोप जाणवू लागला. जंगलेच्या जंगले उजाड होऊ लागली. वृक्ष उघडे बोडके दिसू लागले. मानवाने वसुंधरेचे सौंदर्यच काढून घेतले. प्राण्यांना, पक्षांना आसरा मिळेनासा झाला. आणि या सर्वांचे फार गंभीर परिणाम मानवजातीला भोगावे लागु लागले. आणि मग मात्र मानवाचे डोळे खाडकन उघडले गेले.
जोपर्यंत केलेल्या पापाचा घडा भरत नाही तोपर्यंत मानव निसर्गाचे हे उजाड रूप बघून मजा घेत होता. पण जेव्हा निसर्गाचा कोप मानवी जीवनावर होऊ लागताच मात्र मानवाला जाग येऊ लागली आणि वृक्षारोपण करण्याची संकल्पना मानवाच्या मनात तयार होऊ लागली.

**झाड देतात प्राणवायू**
**म्हणूनच श्वासांना येथे**
**किंमत आहे**
**वृक्षाचे महत्व जाणून**
**हातात घेऊन एखादे रोपटे**
**मातीत रूजवून दाखवू**
**निसर्गाचा समतोल राखुन**
**वसुंधरेचा सन्मान करु**
**झाड देतात फळे, फुले अन्**
**सावली**
**करतात मदत किती मानवा**
**नको आता हाती कुर्हाड**
**घावावर घाव घालू मानवा**

खरंच ही वेळ आहे आता आपण सर्वांनी वृक्षारोपण करण्याची आणि निसर्गाचा समतोल राखण्याची त्यासाठी प्रत्येकाची जबाबदारी आहे. एक तरी रोप लावु त्याचे नीट संगोपन करू आणि मानवाचा भविष्यात होणारा इंधनाचा तुटवडा वाचवू.

**चला चला वृक्षारोपणाला**
**वसुंधरेला सजवायला**
**एक रोप लावूनी**
**तेच दाखवू वाढवूनी...**



## लय भारी सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# कच्च्या केळाचे कटलेट





आधुनिक केसरी

केळ आरोग्यवर्धक असून प्रकृतीसाठी उत्तम आहे. आपण केळाचे वेफर्स, केळाचे शिकरण, केळाचा शिरा असे अनेक पदार्थ खाल्ले असतीलच.
काल अहोंनी मळ्यातली कच्च्या केळ्याचा मोठा घड आणला. कच्ची केळी पटकन खाता पण येईनात... मग काय युनळीवर शोधमोहीम सुरू केली... आजकालची समस्त स्त्रीजात नाही नाही कित्येक पुरूष सुद्धा अन्नपूर्णेच्या रुपात चपखल बसणारे आहेत... शोधलं की सापडतं... या उक्तीप्रमाणे युनळी उघडली की झालं... मग काय ठरवलं... आज केळ्यापासून कटलेट कसे बनवायचे याची रेसिपी शोधली. बऱ्याच बघितल्यावर त्यातल्या सगळ्यांची भेसळ करून त्यात सोप्पी आणि पटकन होणारी रेसिपी केली. प्रयोग उत्तम जमला घरात माणसं भरपूर... रिझल्ट उत्तम लागला सगळ्यांनीच पहीला नंबर दिला... कच्च्या केळांमध्ये पोटॅशियमचा खजिना असतो. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती आणखी सक्षम करण्यासोबतच दिवसभर उत्साह टिकून राहण्यास मदत मिळते. वजन घटवण्यास मदत, वजन घटवण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे केळी खाणं टाळतात. मात्र कच्ची खेळी खाल्ल्यामुळे वजन घटवण्यास मदत होते. (गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहिती). त्यासाठी लिहून घ्या आणि करा हि रेसिपी.

**कच्च्या केळ्याचे कटलेट :-**

**साहित्य :** चार कच्ची केळी, चार पाच हिरव्या मिरच्या, धुवून बारीक चिरलेली कोथिंबीर, चवीनुसार मीठ, साखर, चमचा भर कॉर्नफ्लोअर, नसेल तर तेवढाच मैदा तोही नसेल तर डाळीचे पीठ... चक्क ज्वारीचं पिठ, तेल, आलं, धणेपूड, जिरेपूड, लिंबू, चाट मसाला, काजू, बेदाणे इत्यादी.

**कृती :-** केळ्याचे दोन भाग करा आणि कुकरला चार शिट्ट्या करून घ्या. केळी शिजली की कोमट असतानाच साल काढून आतला गर किसून घ्यावा. किसलेल्या केळ्यात आलं, मिरची, कोथिंबीर, धणेजीरेपूड, चाट मसाला, पिठ जे असेल ते आणि चवीनुसार लिंबू पिळून, साखर, मीठ घालून मळून घ्यावे. छोट्या लिंबाएवढे गोळे करावेत. आतमध्ये १-२ बेदाणे, काजूचे तुकडे घालून कटलेट तयार करावेत. आता तेलावर गोल्डन ब्राऊन रंग येईपर्यंत शॅलोफ्राय करून घ्यावे... भारी, मस्त लागतात. करुन बघा.

**(फोटोंमध्ये काजू बेदाणेची वाटी विसरली.)**

# अनोखं स्नेहमिलन

आधुनिक केसरी

**निवृत्तीनंतर बहुतेक महिला आपलं घर, संसार यातच व्यस्त होतात. वयाच्या साठी नंतरची दुखणी सुद्धा डोकं वर काढायला लागतात. त्यामुळे महिला निवृत्ती नंतर क्वचितच एकमेकांच्या सम्पर्कात रहातात. त्यात पुन्हा कोरोनाची भर पडली. या सर्व पार्श्वभूमीवर एम टी एन एल च्या दोन वर्षांपूर्वी स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या नवी मुंबईतील 130 महिलांचे अनोखं स्नेहमिलन सानपाडा येथील मिलेनियम टॉवर्सच्या शॉपिंग कॉम्लेक्स च्या हॉल मध्ये नुकतंच आनंदात पार पडलं.**

गणेशवंदना आणि स्वागत गीताने कार्यक्रमाला सुरवात झाली. तत्पूर्वी संयोजक अलका भुजबळ यांनी, हा कार्यक्रम न्यूज स्टोरी टुडे च्या वतीने दरमहा घेण्यात येत असलेल्या स्नेह मिलन कार्यक्रमातून आजचा कार्यक्रम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगून कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यावेळी कोरोना काळात दगावलेल्या सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.
या कार्यक्रमात "सीजीएचएस चे फायदे" या विषयावर डॉ एस सुधाकर यांनी उपस्थित महिलांना उपयुक्त माहिती दिली आणि त्यांच्या शंकाचे निरसन केले. केंद्रीय आरोग्य सेवेचे आपल्याकडे कार्ड आहे म्हणून बिनधास्त राहणे हे चुकीचे असून उत्तम आरोग्य ठेवण्यासाठी नियमित योगा, ध्यान धारणा, सकस आहार आणि व्यायाम केला पाहिजे, हिच आरोग्याची गुरुकिल्ली असून सकारात्मक विचार करणाऱ्या लोकांच्या संपर्कात राहिले पाहिजे, असा मोलाचा सल्ला डॉ. एस. सुधाकर यांनी दिला.
डॉ. सुधाकर यांच्या मार्गदर्शनानंतर अनेक निवृत्त महिला कर्मचाऱ्यांनी डॉक्टरांना विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करुन घेतले. यावेळी कार्यक्रमाच्या संयोजक अलका भुजबळ यांच्यासह संयोजन समितीतील महिलांनी डॉ. एस. सुधाकर यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. यानंतर निवृत्ती नंतर स्वस्थ न बसता, सामाजिक कामामध्ये स्वतःला झोकून देणाऱ्या पुढील महिलांचा सत्कार करण्यात आला.



1) दमयंती शर्मा - रॉबिन हूड आर्मी या NGO तर्फे कॅन्सर ग्रस्त मुलांसाठी, गरीब मुलांना जेवणाचे वाटप, वृद्धाश्रमात जाऊन मदत करणे.
2) विजयलक्ष्मी बंडा - लॉयन्स क्लब तर्फे सोशल कामं, तसेच स्वतः यु ट्यूब चॅनल वर भक्तीगीत आणि रामायण, महाभारतचे सार सांगणे.
3) मानसी लाड - दररोज फेसबुक च्या माध्यमातून उदबोधक लेख लिहून विचाराला चालना देतात.
4) वर्षा भाबल - कविता करणे, लेख लिहिणे. रिटायरमेंट नंतर "जीवनप्रवास" हे आत्म चरित्रपर 27 लेख न्यूजस्टोरीटुडे वेबपोर्टलवर प्रसिद्ध झालेत.
5) विलासिनी बडे - ऑनलाईन, ऑफलाईन योगा शिकवतात.
6) अलका भुजबळ- न्यूजस्टोरीटुडे या वेबपोर्टल च्या सहसंपादक आहेत, तसेच लेखन, निवेदन, अभिनय, महिलांचे आरोग्य या विषयी जनजागृती कार्यक्रम. या विविध क्षेत्रात सुध्दा त्या कार्यरत आहेत.

अशा 6 महिलांचा सत्कार करण्यात आला. समाजासाठी कामं करताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, ह्याने मनाला समाधान आणि ऊर्जा मिळते असा संदेश यावेळी दिला गेला. यावेळी वेगवेगळे खेळ, प्रश्न मंजुषा, बक्षीस, सेल्फीपॉईंट असे मनोरंजक कार्यक्रम करण्यात आले. काही महिलांनी उस्फुर्तपणे गाणी गायली. कविता, भारुड, अनुभव कथन केले. तसेच स्नेहमिलनाची गरज याविषयावर संवाद साधून कार्यक्रमाचा भरभरून आनंद घेतला. असं स्नेहमिलन दरवर्षी घ्यावं, ही काळाची गरज आहे असें ठरवून प्रत्येकीला भेटावस्तू देऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

# पेरण्या रखडल्या

आधुनिक केसरी

**जून महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. राज्यातील बहुतांश भागात जून महिना कोरडाच गेला आहे. मान्सूनपूर्व पावसानेही यावर्षी दगा दिला आहे. जून महिन्यात सरासरी इतकाही पाऊस झाला नाही त्याचा विपरीत परिणाम पेरण्यांवर झाला आहे. पाऊस लांबल्याने राज्यात केवळ १५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत.**

अद्यापही ३३ टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या नाहीत. बळीराजा पावसाचा अंदाज घेऊन पेरण्यांचे नियोजन करत आहे. मात्र ज्यांनी पेरण्या केल्या आहेत ते वरुण राजाला विनवणी करत आहेत कारण जर वेळीच आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर दुबार पेरणीचे संकट बळीराजावर ओढवू शकते. जूनमध्ये आतापर्यंत २०७ मिलीमीटर पाऊस होणे अपेक्षित असताना केवळ ४१ टक्के पाऊस झाला असून तो ८५. ६ मिलिमीटर इतका आहे. गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने या काळापर्यंत बहुतेक ठिकाणी पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. यावर्षी मात्र पुरेसा पाऊस न झाल्याने कपाशी, धान, सोयाबीन, कडधान्ये या मुख्य पिकांच्या पेरण्या रखडल्या आहेत.
पेरण्या रखडल्याने बळीराजा चिंतेत असला तरी समाज आणि प्रशासनाला मात्र त्याचे काही सोयरसुतक असल्याचे दिसत नाही. बळीराजा आभाळाकडे नजर लावून बसला असताना राज्यातील लोक आणि प्रशासन यंत्रणा मात्र हातात रिमोट घेऊन टीव्हीवर राजकीय महानाट्य पाहण्यात मग्न आहेत. पाऊस पडला काय आणि नाही पडला काय आपल्या जीवनात काय फरक पडतो ? अशा अविर्भावतच सर्वजण वागत आहेत. मात्र पुरेसा पाऊस न झाल्यामुळे पेरण्या रखडल्या तर त्याचा फटका बळीराजलाच नव्हे तर सर्वांनाच बसणार आहे. पाऊसपाण्याची व्यथा केवळ बळीराजाची वाटत असली तरी प्रत्यक्ष तिचे व्यापक परिणाम होत असतात. उत्पादन कमी झाले तर अन्नधान्याच्या किंमतीवर त्याचा परिणाम होतो आणि सगळ्यांनाच महागाईचा सामना करावा लागतो. सर्वसामान्य आणि नोकरदारवर्गाची आर्थिक कुचंबणा होते. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचीही टंचाई निर्माण होते. याउलट जर चांगला पाऊस झाला, वेळेवर पेरण्या झाल्या, भरघोस पिके आली तर त्याचा बाजारपेठेवर आणि एकूणच अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम होतो.
सरकारलाही विकास कामांसाठी पैसा उपलब्ध होतो. बळीराजाचे नुकसान झाले की सरकारला त्यांना नुकसानभरपाई द्यावी लागते त्यामुळे विकास कामांना कात्री लागते. एकूणच पावसाअभावी पेरण्या रखडल्या तर त्याचा खूप दूरगामी परिणाम होतो. हा परिणाम केवळ बळीराजावरच नव्हे तर समाजातील सर्वच घटकांवर होतो त्यांमुळेच आता जुलै महिन्यात तरी वरुण राजाने कृपा करावी असे साकडे बळीराजा वरुण राजाला घालत आहे. जर वरुण राजाने कृपा केली नाही आणि जून प्रमाणे जुलैही कोरडा गेला तर बळीराजा हतबल होईलच पण त्याचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवर देखील होईल.

**श्याम ठाणेदार**

# सामान्यापासून असामान्यापर्यंतचा प्रवास म्हणजे नरेंद्र ते विवेकानंद

आधुनिक केसरी

**इंग्रजांचे वर्चस्व असताना भारतभूमी व हिंदू धर्म यांच्या उद्धारासाठी अहर्निश चिंता वाहणारी आणि तन, मन, धन व प्राण याच उद्धार कार्यासाठी अर्पण करणारी काही रत्ने भारतात होऊन गेली. त्यांपैकी एक दैदिप्यमान रत्न म्हणजे स्वामी विवेकानंद. धर्मप्रवर्तक, तत्त्वचिंतक, विचारवंत व वेदांतमार्गी राष्ट्रसंत आदी विविध नामाभिदांनी विवेकानंद जगभरात प्रसिद्ध आहेत. ऐन तारुण्यात संन्यासाश्रमाची दीक्षा घेत तेजस्वी व ध्येयवादी बनलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वामी विवेकानंद. स्वामी विवेकानंदांचे आज पुण्यस्मरण आहे. स्वामी विवेकानंदाच्या व्यापक चरित्राचा घेतलेला हा अगदी थोडक्यात आढावा...**

### पूर्वायुष्य आणि बालपण

स्वामी विवेकानंद यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ. स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकात्यात झाला. बालपणापासून विवेकानंद वृत्तीने श्रद्धाळू व कनवाळू होते. ते बालपणात कोणतेही साहसी कृत्य बेधडकपणे करत. स्वामी विवेकानंदांचे संपूर्ण कुटुंब अध्यात्ममार्गी असल्यामुळे बालपणात त्यांच्यावर धर्मविषयक योग्य संस्कार झाले. विवेकानंदांनी मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला. पुढे कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी महाविद्यालयातून त्यांनी 'तत्त्वज्ञान' या विषयात एम. ए. केले.

### गुरुभेट आणि सन्यासदीक्षा

गुरुभेट होण्यापूर्वी विवेकानंदांनी अनेकांना, तुम्ही देव पाहिला आहे का?, असा प्रश्न विचारला होता. पण कुणाकडूनही सकारात्मक उत्तर आले नाही. दक्षिणेश्वरच्या भेटीत रामकृष्ण परमहंस यांना हाच प्रश्न केल्यावर, होय, मी देव पाहिला आहे व तुझी इच्छा असेल तर मी तुलाही त्याच दर्शन घडवू शकेन, असे निःसंदिग्ध उत्तर मिळाल्यामुळे नरेंद्र त्यांच्याकडे आकृष्ट झाले. वडिलांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आणि नरेंद्राला तीव्र मानसिक क्लेशांमधून जावे लागले. या कालात नरेंद्र प्रथमच कालीमातेच्या मंदिरात तिच्यासमोर नम्र झाला आणि श्रीरामकृष्णांमुळे अद्वैतसिद्धांताचा प्रत्यय येऊन गेला. यानंतर नरेंद्राचे जीवन संपूर्णपणे पालटून गेले. रामकृष्णांनी महासमाधी घेतल्यावर त्यांच्या आज्ञेनुसार नरेंद्र आणि त्याचे दहाबारा गुरुबंधू यांनी घरादाराचा त्याग केला.

### भारतभ्रमण


रामकृष्ण यांच्या समाधीनंतर स्वामी विवेकानंद भारत भ्रमण करण्यास बाहेर पडले. कन्याकुमारी या भारताच्या दक्षिण टोकाला जाऊन पोहोचले आणि एका शिलाखंडावर जाऊन ध्यानात बसले. त्यावेळी भारतातील दैन्य पाहून त्यांचे कासावीस झालेले मन अधिकच हळवे झाले. भारताच्या कल्याणासाठी, येथील जनतेच्या उद्धारासाठी आयुष्य समर्पित करणे आणि त्यासाठी या मातृभूमीचा सेवक बनून झटेन, असा दृढ संकल्प स्वामीजींनी केला. राजा अजितसिंग खेत्री यांनी १० मे १८९३ रोजी स्वामीजींना 'विवेकानंद' असे नाव दिले.

### धर्मपरिषदेसाठी शिकागोला रवाना

३१ मे १८९३ रोजी 'पेनिनशुलर' बोटीने मुंबईचा किनारा सोडला. धर्मपरिषद ११ सप्टेंबर रोजी होणार असल्याचे त्यांना समजले. धर्मपरिषदेत भाग घेण्यासाठी आवश्यक असलेले परिचयपत्र त्यांच्याजवळ नव्हते. त्यात पुन्हा प्रतिनिधी म्हणून नाव नोंदवण्याची मुदतही उलटून गेली होती. पहिल्याच दिवशी हार्वर्ड विद्यापीठातील ग्रीक भाषेचे प्रा. जे.एच. राईट हे स्वामीजींशी चार तास बोलत बसले. स्वामीजींच्या प्रतिभेने व बुद्धिमत्तेने ते इतके मुग्ध झाले की, धर्मपरिषदेत प्रतिनिधी म्हणून प्रवेश मिळवून देण्याची सारी जबाबदारी त्या प्राध्यापकांनी स्वतःवर घेतली.

### शिकागो सर्वधर्मपरिषदेत विवेकानंदांचा सहभाग

अमेरिकेतील शिकागो येथे ११ सप्टेंबर १८९३ रोजी झालेल्या सर्वधर्मपरिषदेच्या माध्यमातून साऱ्या जगाला आवाहन करणारे स्वामी विवेकानंद साऱ्या भारतवर्षातील धर्माच्या प्रतिनिधीच्या नात्याने या परिषदेस आले होते. 'अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो' या शब्दांनी सुरुवात करून त्यांनी सभेला संबोधित केले. त्यांच्या चैतन्यपूर्ण आणि ओजस्वी वाणीने सारे मंत्रमुग्ध झाले. या शब्दांत अशी काही अद्‌भुत शक्ती होती की, स्वामीजींनी ते शब्द उच्चारताच हजारो जण आपल्या जागीच उठून उभे राहिले आणि त्यांनी टाळयांचा प्रचंड कडकडाट केला.




### प्रवचनांद्वारे प्रसारकार्य

परदेशात भारताचे नाव उज्ज्वल करून मायदेशात परतल्यावर नागरिकांनी स्वामीजींचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर स्वागत झाले. माझ्या मोहिमेची योजना, भारतीय जीवनात वेदांत, आमचे आजचे कर्तव्य, भारतीय महापुरुष, भारताचे भवितव्य यांसारख्या विषयांवर त्यांनी व्याख्याने देण्यास सुरुवात केली. स्वामी विवेकानंद यांनी परदेशी व स्वदेशी दिलेल्या व्याख्यानांतून आपली मते वेळोवेळी ओजपूर्ण भाषेत मांडली. स्वामी विवेकानंदांच्या या विचारांचा फार मोठा परिणाम झाला. परदेशातही त्यांनी वेदांताच्या वैश्विक वाणीचा प्रचार केला. शुक्रवार, जुलै ४, १९०२ या दिवशी विवेकानंदांनी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली.

# तरुणांना स्फूर्ती देणारा चिरंतन झरा : स्वामी विवेकानंद

आधुनिक केसरी

**गांधीजी म्हणतात, विवेकानंद वाङ्मयाच्या वाचनाने माझ्या देशभक्तीत एक हजार पटीने वाढ झाली. नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणतात, आज स्वामी विवेकानंद असते, तर मी त्यांची गुरुस्थानी स्थापना केली असती. जवाहरलाल नेहरू म्हणतात की, विवेकानंद हे अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय करणारे महापुरुष होते. स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्यापासून ते जमशेटजी टाटा यांच्यापर्यंत शेकडो महापुरुषांनी विवेकानंदांच्या जीवन व विचारातून प्रेरणा घेतली. योद्धा, संन्यासी आणि कोट्यवधी तरुणांचे स्फूर्तिस्थान म्हणजे स्वामी विवेकानंद.**

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत सर्वच स्तरांतील लोकांचे जीवन गतिमान झाले आहे. जीवनात अचानक आलेल्या या गतीमुळे सर्वसामान्यांची स्थिती भांबावल्यासारखी झाली आहे. ज्ञानार्जन करू पाहणाऱ्या तरुणांची स्थितीही याहून वेगळी नाही. अशा स्थितीत मनाला स्थैर्य देऊन आपल्या प्रगतीला सहाय्यक ठरणाऱ्या विचारांची निकड आहे. अशावेळी 'फोटोग्राफिक मेमरी'साठी प्रसिद्ध असलेल्या स्वामी विवेकानंद यांचे विचार आपल्या मदतीला धावून येतात. म्हणूनच विवेकानंद पुण्यतिथीच्या निमित्ताने शक्तीदायी विचारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करीत आहे.नोबेल परितोषिक विजेते आणि विख्यात विचारवंत गुरुदेव रवींद्रनाथ टागोर म्हणतात, "तुम्हाला जर भारत जाणून घ्यायचा असेल, तर विवेकानंदांचा अभ्यास करा. त्यांच्यात सर्वच सकारात्मक आहे, नकारात्मक काहीही नाही."

सकारात्मक विचारांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते. सकारात्मक विचारामुळे जीवनाचे नंदनवन होऊ शकते, परंतु केवळ सकारात्मक विचार उपयोगाचे नसून, माणसाला आपल्या ध्येयाची निश्चितीही करता आली पाहिजे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, "एखादे ध्येय निश्चित केलेला मनुष्य शंभर चुका करीत असेल, तर ध्येय नसलेला मनुष्य दहा हजार चुका करतो." तात्पर्य असे की, ध्येयामुळे आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो, परंतु असे असले, तरी ध्येयाची निवड देखील महत्त्वाची बाब असते.

स्वामी विवेकानंदांच्या जीवन वाङ्मयातून आपल्याला उच्च ध्येयमार्गासाठीची दिशा मिळते. स्वामी विवेकानंदांचे जीवन पाहा. गुरुदेव रामकृष्णांच्या प्रयाणानंतर स्वामीजींनी संपूर्ण भारताचे भ्रमण केले आहे. भारत म्हणजे काही केवळ कागदावरचा नकाशा नाही. भारत म्हणजे भारतातले लोक. इथली गावं, इथल्या नद्या, पर्वत, इथे होऊन गेलेले ऋषीमुनी, इथले तत्त्वज्ञान आणि खूप काही... जोवर आपण खरा भारत समजून घेत नाही, तोवर तिच्याप्रती मनात भक्तीभाव निर्माण होणे कसे शक्य आहे? एखाद्या व्यक्तीप्रती प्रेम किंवा तिरस्कार तेव्हाच निर्माण होते, जेव्हा आपल्याला तिच्या गुण-दोषांची ओळख होते. देशाच्या बाबतीतही हेच तत्त्व लागू आहे. आपण इतिहास वाचलेला असतो. इतिहासातील आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाने आपला ऊर अभिमानाने भरून येतो. हा अनुभव आपल्या साऱ्यांचाच आहे. म्हणूनच केवळ प्राचीन भारत ग्रंथातून अभ्यासून न थांबता स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण वर्तमान भारत पायी फिरून अनुभवला. शेवटी स्वामीजी देशाच्या दक्षिण टोकाला- कन्याकुमारी येथे आले. तिथल्या श्रीपाद शिलेवर की, जिथे देवी पार्वतीने कैलासातल्या शिवशंकरासाठी एका पायावर तपश्चर्या केली होती, तिथे २५, २६ आणि २७ डिसेंबर १८९२ या तीन दिवस-रात्री त्यांनी ध्यान केलं.



हा पहिला सन्यासी होता की, ज्याने आपल्याला वैयक्तिक मोक्ष अथवा मुक्ती मिळावी म्हणून ध्यान साधना केली नाही. भारताला पुन्हा तिचं गतवैभव कसे मिळवता येईल हा त्यांच्या ध्यानाचा केंद्रबिंदू होता.एकेकाळी वैभवावर असलेल्या या देशाचे भग्नावशेष त्यांनी जागोजागी भ्रमणकाळात पाहिले होते. पाश्चात्य देशातील लोकांना जेव्हा कपडे घालण्याचीही बुद्धी नव्हती. तेव्हा या देशात एक प्रगल्भ संस्कृती नांदत होती, हेही त्यांना माहीत होते, परंतु आज मात्र भारत गुलामीत होता. भारताचा स्वाभिमान ब्रिटिशांनी पायदळी तुडवला होता. दारिद्र्याने आणि लाचारीने कळस गाठला होता. जातीभेद स्पृशास्पृशतेसारख्या घातक रूढींनी उच्छाद मांडला होता. अज्ञानाचा अंधःकार गडद झालेला होता. अशा स्थितीतून पुन्हा भारताचे उत्थान घडवून आणायचे तर काय करावे लागेल हा त्यांच्या ध्यानाचा विषय होता. अखेर एक शक्तिशाली विचार घेऊन स्वामीजी त्या शिलेवरून उठले. आपण आत्मविश्वास गमावलेला आहे, त्यामुळेच आजची अधोगती झाली. या देशाला पुन्हा आत्मविश्वास मिळवून देणे हे विवेकानंदांच्या जीवनाचे ध्येय बनले.

जगावर राज्य करणाऱ्या लोकांच्या देशात जाऊन आमच्या देशाचा तरुण विजय मिळवतो, ही घटना समस्त भारतीयांना आत्मविश्वास देणारी ठरली. यातूनच खऱ्या अर्थाने भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाला बळ मिळाल्याचा इतिहास आहे.

स्वामी विवेकानंदांनी भारतीयांना भारताकडे भारतीय दृष्टिकोनातून पाहायची दृष्टी दिली.

स्वामी विवेकानंद म्हणजे साक्षात घनिभूत देशभक्ती. त्यांचा युवा पिढीवर प्रगाढ विश्वास होता. भारताच्या पुनरुत्थानच्या कार्यासाठी युवकच पुढे येतील, असा त्यांना विश्वास होता. देशभक्तीचे मूर्तीमंत प्रतीक असणारे स्वामी विवेकानंद केवळ भारतासाठीच प्रेरक आहेत असे मात्र बिलकुल नाही. संपूर्ण जगात सुख-शांती नांदण्यासाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन लाखमोलाचे ठरले होते. म्हणूनच तर साऱ्या जगासाठी असा काय संदेश स्वामीजींनी दिला होता, तेही समजून घेतले पाहिजे. अन्यथा मोठा गोंधळ होईल. दोन वर्षांपूर्वी जपानचे पंतप्रधान भारतात आले होते. संसदेला संबोधित करताना पंतप्रधान ऍबे सिंझो म्हणाले की, जपान भारताचा ऋणी आहे. कारण जपानचे शिल्पकार तेनशिन ओकाकुरा यांनी स्वामी विवेकानंद यांच्यापासून प्रेरणा घेतली होती. ते पुढे असे म्हणाले की, जगाचे नेतृत्व करण्यासाठी जपान आणि भारत या दोन्ही देशांनी पुढाकार घेतला पाहिजे.'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन' या विख्यात पुस्तकाचे लेखक आणि नामवंत इतिहासकार सॅम्युअल हंटिंग्टन म्हणतात की, जगात तिसरे महायुद्ध झालेच तर ते एकांतिक विचारधारा मानणाऱ्या धर्मीयांकडून होईल. माझाच धर्म खरा या दुराग्रहामुळे होईल. यातून वाचण्याचा एकच मार्ग असेल, तो म्हणजे भारतीय मार्ग अर्थात हिंदू विचारधारा. आकाशातून पडणारे पाणी शेवटी या ना त्या मार्गाने समुद्राला मिळते. त्याप्रमाणे तुम्ही कोणत्याही ईश्वराची उपासना केली तरी ते अंती एकाच ईश्वराला पोचते, अशी भारतीय विचारधारा आहे. हाच हिंदू विचार अर्थात वेदांत हा भावी जगाचा मार्ग असणार आहे असे स्वामी विवेकानंद म्हणतात. हाच विचार आहे की, जो जगात शांती आणू शकतो, परंतु यासाठी हा विचार सांगणारा देश दुर्बल असून, चालणार नाही.

भारताने गेल्या दहा हजार वर्षांत कोणत्याही देशावर आक्रमण केले नाही. कारण दुसऱ्यांना पायदळी तुडविणे हा भारताचा स्वभाव नाही, परंतु जगाला शांतीचा आणि शाश्वत मार्ग दाखवायचा असेल, तर भारताने बलशाली झालेच पाहिजे. त्याला पर्याय नाही. भारताला बलशाली करण्याच्या कार्यात आपला खारीचा वाटा उचलणे हेच आपल्यासमोरचे सर्वोच्च ध्येय असू शकते. तुम्ही विद्यार्थी असा की, शिक्षक, शिपाई असा की, अधिकारी, शेतकरी असा की, सौनिक तुम्ही कोणीही असा, आपले सर्वोच्च ध्येय भारत पुनरुत्थानाच्या कार्यात योगदान देणे हेच असू द्या. स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत सांगायचे तर आगामी काळात हे राष्ट्र हेच तुमचे दैवत असू द्या. एकदा ध्येय ठरले की, कार्य करण्याची दिशा आपोआप गवसून जाईल.

संघटित कार्य करण्याचा मंत्र स्वामीजींनी दिला आहे. संघटित कार्यात सहभागी झाल्याने आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाचा वेग वाढतो. विवेकानंदांच्या शब्दांत, करावयास लागा म्हणजे कळून येईल की, तुमच्यात किती प्रचंड सामर्थ्य आहे. व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यासाठी शक्तीदायी विचारांची सोबत आवश्यक असते.

# पत्रकार दिलीप जोशी यांना जीवे मारण्याची धमकी देत चापट बुक्क्यांनी मारहाण

## बिडकिन येथे शिवसेना समर्थकांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**आप्पासाहेब भावले**

**आडूळ :** महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली व कार्यकर्ते यांनी आपापल्या परिसरात फटाके वाजवून जल्लोष साजरा केला. पैठण तालुक्यातील बिडकिन बसस्थानक परिसरात शिवसैनिकांनी फटाके वाजवून व घोषणा देत जल्लोष केला. यावेळी जल्लोषमय वातावरणाची वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकाराला शिवसेना समर्थकांकडून जीवे मारण्याची धमकी देत, चापट बुक्क्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करत सार्वजनिक ठिकाणी लज्जास्पद वर्तन केल्याप्रकरणी बिडकिन पोलिस ठाणे येथे रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिडकिन येथील महाराष्ट्र माझा 24 युट्यूब चॅनल पत्रकार दिलीप मधुकर जोशी, वय ३५ वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बिडकिन बसस्थानक परिसरारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली व समर्थकांकडून जल्लोष साजरा करत असताना बातमी संकलन करण्यासाठी गेलो असता बिडकिन येथील शिवसेना समर्थक डिंगबर तुळशीराम कोंथिबीरे रा.बिडकिन हे नशा धुंद अवस्थेत तेथे येऊन त्याने काही एक कारण नसताना मला शिवीगाळ करत चापट बुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी पत्रकार दिलीप जोशी यांनी बिडकिन पोलिस ठाणे येथे धाव घेतली व डिंगबर तुळशीराम कोंथिबीरे याच्यावर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी फिर्यादी जोशी यांनी केली आहे.



यावेळी महाराष्ट्र प्रसारमाध्यमांतील व्यक्ती आणि प्रसारमाध्यमांचा हिंसक कृत्य व माध्यमांचे नुकसान/हानी अधिनियम 2017 प्रमाणे कलम 3 अन्वये पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत व कलम 323,294,506 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील घटनेतील आरोपी हा अद्याप ताब्यात घेण्यात आला नसून रात्री उशिरापर्यंत ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. सदरील घटनेचा तपास पैठण पोलिस उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल हे करित आहे. सदरील घटनेचा निषेध महाराष्ट्रभर केल्या जात असून आरोपींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध पत्रकार संघाच्या वतीने केली जात आहे.

# पिंपळवाडी ग्रामपंचायत येथे ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील मौजे पिंपळवाडी ग्रामपंचायत येथे ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आले आहे.



पिंपळवाडी गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या सोडण्यासाठी ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आले आहे.

या प्रश्नांबाबत शासन गंभीर असून, ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या अनुषंगाने त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी पिंपळवाडी ग्रामपंचायतने पुढाकार घेतला आहे.

औरंगाबादसह राज्यातील सर्व जिल्ह्यात प्रत्येकी एक ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. येत्या पंधरा दिवसांत जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

कोरोना संसर्गामुळे सर्वच घटकांना फटका बसला असून, ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांच्या सर्व अडी-अडचणी तातडीने सोडविण्यासाठी पिंपळवाडी ग्रामपंचायतच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे ग्रामपंचायतमध्ये झालेल्या बैठकीत करण्यात आले आहे.

दरम्यान, पिंपळवाडी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक भवते दैनिक केसरी चे प्रतिनिधी बहादुर चव्हाण यांच्याशी बोलत असताना सांगितले, ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आले आहे. याठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी लायब्ररी व समस्या सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक कक्ष सुरू केले आहे.

# कर्मचारी, विद्यार्थी होतील आत्मनिर्भर : प्रो. चंद्रकांत रागीट

## हिंदी विद्यापीठात पंचगव्य आधारित उत्पादनांवर कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ आणि महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्था, वर्धा (एमगिरी) यांच्या संयुक्त विद्यमाने पंचगव्य आधारित उत्पादनांवर कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दोन दिवसीय (1 व 2 जुलै) प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन शुक्रवार 1 जुलै रोजी विश्वविद्यालयाच्या दत्तोपंत ठेंगडी सभागृहात प्र.कुलगुरू प्रो. चंद्रकांत रागीट यांच्या अध्यक्षतेत करण्यात आले.

आझादीच्या अमृत महोत्सवांतर्गत भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे सप्ताह साजरा केला जात असून त्याअंतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी एमगिरीचे वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक डॉ. जयकिशोर छांगाणी यांनी पंचगव्यावर आधारित उत्पादने तयार करण्याची प्रक्रिया समजावून सांगितली आणि एमगिरीने स्वयंनिर्भर बनवण्याच्या दिशेने उत्पादित केलेल्या उत्पादनांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात प्रकुलगुरू प्रो. चंद्रकांत रागीट म्हणाले की, पहिल्या टप्प्यात विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. येत्या काही दिवसांत विद्यार्थ्यांनाही प्रशिक्षण दिले जाईल. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महात्मा गांधी फ्यूजी गुरुजी समाजकार्य अध्ययन केंद्राचे निदेशक प्रा. मनोज कुमार म्हणाले की, महात्मा गांधींनी कृषि आधारित उद्योगांना चालना देण्याबाबत सांगितले होते. हा विचार समोर ठेवून विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. परिसरातील लोकांनाही पंचगव्य आधारित उत्पादनांचा लाभ मिळणार आहे. उद्घाटनानंतर गोशाळेत पंचगव्यांवर आधारित उत्पादने तयार करण्याच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. शिवसिंह बघेल यांनी केले तर आभार डॉ. मिथिलेश कुमार तिवारी यांनी मानले. यावेळी डॉ. के. बालराजु, डॉ.प्रियंका मिश्र, विनोद वैद्य यांच्यासह कार्यशाळेत सहभागी झालेले कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.





# जोंधळे फाउंडेशन वतीने जय जैतोबा परिसर येथे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील दलित चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते शिवसेना उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे यांच्या जोंधळे फाउंडेशन व परिवारावतीने धुळे तालुक्यातील डोंगराळे येथील जय जैतोबा महाराज विश्वस्त ट्रस्ट येथे आईसो कालकथीत सुशिलाताई जोंधळे, कालकथीत पहिलवान सुनिल नारायण जोंधळे, कालकथीत राजेंद्र नारायण जोंधळे यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण कार्यक्रम दि.1 जुलै रोजी जैतोबा विश्वस्त ट्रस्ट चे अध्यक्ष आशोक म्हसदे, सचिव सुरेश म्हसदे, खजिनदार दयाराम म्हसदे, सदस्य बारकु म्हसदे, बापु म्हसदे, शिवसेना उपमहानगरप्रमुख संजय जवराज, विलास शिंदे, संजय पोळ, भाईदास गांगुर्डे, अरूण वाघ, आशोक आहिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी जोंधळे परिवाराच्यावतीने 15 फुट उंचीचे 25 वृक्ष ज्यात कदम, लिंब, पिंपळ, वड आदी प्रकारच्या वृक्षांची लागवड या झाडांना संरक्षण लाभावे म्हणुन पिंजरा जाळीसह करण्यात आले. डोंगराळे परिसरातील ओसाड डोंगरावर जैतोबा महाराज यांचे देवस्थान असुन नवसाला पावणारे म्हणुन त्यांची अख्यायीका सांगितली जाते. या ठिकाणी बाराही महिने नवसाचे कार्यक्रम पार पडत असतात. भाविकांच्या दृष्टीने हे तीर्थक्षेत्र नयनरम्य व्हावे, या करीता जोंधळे परिवार दरवर्षी या ठिकाणी वृक्षारोपणासह अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देणार असल्याचे या कार्यक्रमाचे आयोजक उपजिल्हाप्रमुख किरण तात्या जोंधळे यांनी सांगितले. जोंधळे फाउंडेशन वतीने वर्षभर राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमाबाबत त्यांनी उपस्थितांना माहीती दिली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय जोंधळे, गौतम जोंधळे, शक्ती जोंधळे, पंकज जोंधळे, प्रविण जोंधळे, राहुल जोंधळे, सागर जोंधळे, कपील बावीस्कर आदींनी प्रयत्न केले.

# हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनतर्फे महेश पालकर यांचा सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शासकीय कामानिमित्त औरंगाबाद दौऱ्यावर आलेले महाराष्ट्र राज्याचे माध्यमिक शिक्षण संचालक पुणे महेश पालकर यांचा हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनतर्फे काल रात्री 7:30 वाजता औरंगाबाद येथे सत्कार करण्यात आला. हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी माध्यमिक शिक्षण संचालक पुणे महेश पालकर यांचा परंपरेनुसार पुष्पगुच्छ न देता पुस्तक आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला.

याववेळी शेख अब्दुल रहीम यांनी शिक्षण संचालकांसमोर शिक्षकांचे प्रश्न मांडले व DCPS/NPS खाते नसलेल्या शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाचे पहिले दोन हप्ते रोखीने देण्यात यावे अशी विनंती केली. यावेळी हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे राज्य उपाध्यक्ष शफीक पठाण, जिल्हाध्यक्ष सय्यद ताजीमोद्दीन तसेच शिक्षक समन्वय संघाचे समन्वयक के.पी. पाटील, गणेश पवार आदींची उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# अक्षर मानव राज्यस्तरीय योग संमेलन कल्याणमध्ये उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** अक्षर मानव योग विभाग आयोजीत 2 दिवसीय योग संमेलन दिनांक 25 व 26 जुन 2022 रोजी कल्याण येथे अनेक योग तज्ञांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाले. अनेक योग प्रेमींनी या संमेलनाला हजेरी लावून संमेलन यशस्वी करण्यास सहकार्य केले. पहिल्या दिवशी संमेलनाची सुरुवात आणि सूत्रसंचालन अक्षर मानव योग विभाग प्रमुख दिपेश मोहिते यांनी केले. प्रसिद्ध योग प्रशिक्षक श्रुती शिंदे आणि सुहासिनी ग्रुपच्या सर्व सदस्यांनी योग महत्व?, योग म्हणजे काय?, अनेक कठीण आसने यांची प्रात्यक्षिकं दाखवून उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. सुहासिनी ग्रुपचे गुरू प्रवीण जी यांनी योग वरील विशेष गाणे गाऊन त्यांच्या सत्राची सांगता केली. अक्षर मानव राज्य अध्यक्षा प्रणोती ताई पाटील आणि ज्येष्ठ समाजसेवक अशोक जाधव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर 3D फिटनेस सेंटर विद्यार्थ्यांनी योग नृत्य दाखवून विशेष आसनांचे प्रात्यक्षिके दाखवली. योग प्रशिक्षक मृणाल धुरी यांनी आहार आणि विहार या विषयावर अत्यंत सोप्या भाषेत माहिती दिली. पुढील सत्रात माया नायक यांनी स्त्रियांचे आजार आणि योग या विषयाला अगदी सहज स्पष्ट करत उपस्थित महिलांना प्रभावित केले. प्रेक्षकांनी ही आपल्या मनातले अनेक प्रश्न विचारून उत्तम प्रतिसाद दिला. शेवटच्या सत्रात प्रसिद्ध प्रशिक्षक नारायण दातखीळे सर यांनी योग आणि यम- नियम या महत्वाच्या अंगाला अगदी सहज स्पष्ट केलं. अनेक उदाहरणे, दाखले देत विस्तृत विषय उपस्थितांना उलगडून दिला.





त्यानंतर दुसऱ्या दिवशी योग प्रशिक्षक प्रमोद शिंदे यांच्या कठीण आसनं, शुद्धी क्रिया यांची प्रात्यक्षिक दाखवून, त्यांच्या सहकारी कीर्ती आणि मृणाल MAM यांच्या संगीत नृत्य आणि प्रार्थना यांनी सुरुवात झाली. या तिघांचा सन्मान शिक्षण विभाग प्रमुख नीलिमा पगारे यांचे हस्ते झाला. त्यानंतर पुढील सत्रात प्रशिक्षिका विद्या कोरके यांनी योगाचा उगम, महत्व आणि नियम यांचे छान विश्लेषण केले. उपस्थितांनीही त्यावर प्रश्न विचारले. विद्या यांचा ही विशेष सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतरच्या महत्त्वाच्या सत्रासाठी योग तज्ञ विजया खरे आणि त्यांचे पती खरे सर उपस्थित होते. ध्यान म्हणजे काय, त्याचे महत्त्व काय आणि ते कसे करावे यावर विज्ञाननिष्ट चर्चा आणि स्पष्टीकरण ते ही प्रात्यक्षिकासह झाले. अनेक उपस्थितांनी यावर प्रश्न विचारले. खरे MAM यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत विषयाला लोकांपर्यंत पोहचवले. या कार्यक्रमाला अक्षर मानव संस्थापक राजन खान यांची विशेष उपस्थिती होती. अक्षर मानव मधमाशी पालन विभाग प्रमुख प्रशांत सावंत यांनी ही मधमाशी आणि मध यावर महत्त्वपूर्ण माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटच्या सत्रात योग कार्यात समर्पित योग सेवकांचा, त्यांच्या कार्याचा विशेष सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या कार्याचा आढावा देऊन गौरव करण्यात आला. या वर्षीचा अक्षर मानव योग सेवा गौरव पुरस्कार माया नायक, विजया खरे आणि नारायण दातखिळे यांना देण्यात आला. सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. सर्व पुरस्कार विजेत्यांनी आपले मनोगत व्यक्त करून आभार मानले. या कार्यक्रमात प्रायोजक म्हणून नगसेविका माधुरी काळे आणि प्रशांत काळे यांनी विशेष सहकार्य केले. अक्षर मानव आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत डांगे, साहित्य विभाग प्रमुख संजीवनी राजगुरू, प्रशासन प्रमुख सचिन पोवळे, सलीम तहसीलदार, पालघर योग विभाग जिल्हा प्रमुख किशोरी पाटील यांनी या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दाखवली. 3D फिटनेस सेंटर चे सर्वेसर्वा विजय मौर्या आणि सुनीता मौर्या यांचे विशेष सहकार्य लाभले, अक्षर मानव तर्फे त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अक्षर मानव जिल्हा प्रमुख क्षितिज देसाई आणि रणजित रणसिंग यांनी सर्व कार्यक्रमाच्या कामात विशेष सहभाग दाखवून व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली त्यांचा ही सन्मान करण्यात आला.

एकूणच संमेलनाचं सर्वांनी कौतुक करून योग विषयावरील कार्यक्रमाची अजुन आखणी करावी अशी विनंती केली.

आयोजकांनी सर्वांचे आभार मानून लवकरच योग कार्यशाळा, स्पर्धा आयोजनाचे आश्वासन देऊन, येणाऱ्या जानेवारी 2023 मध्ये दुसरे योग संमेलन आयोजित केले जाईल असे घोषित केले आणि संमेलनाचा समारोप करण्यात आला.




# नितिन गडकरी यांच्या हस्ते ऑल वुमेन ग्लोबल डिलिव्हरी सेंटरचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** सन 2009 मध्ये स्थापन झालेली नीयामो, ग्लोबल पेरोल आणि ईओआर सेवा प्रदान करणाऱ्या आघाडीच्या कंपनीने सडक परिवहन मंत्री आणि महामार्गमंत्री नितिन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या हस्ते वुमेन ग्लोबल सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

नियामो ही जागतिक वेतन आणि ईओआर सेवांच्या जगातील आघाडीच्या प्रदात्यांपैकी एक आहे आणि तिचे जगभरात पसरलेले 3000 पेक्षा जास्त कर्मचारी आहेत. नोकरीच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने कंपनीने टियर 2 आणि टियर 3 असे तीन सेंटर तयार करण्यात आले आहे. ईतकेच नव्हेतर भारतामधील 20 शहरांमध्ये अशी आणखी सेंटर स्थापन करण्याचा उदेश्य आहे.

भारतातील अनेक शहरांमध्ये आपली उपस्थिती वाढवल्यानंतर, नियामोने आपल्या पहिल्या ऑल वुमेन सेंटरसाठी निवड केली, अशी माहिती नियामोचे सीईओ रंगराजन शेषाद्री यांनी पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले की, नागपूरसारख्या शहरात आम्ही महिलांसाठी एक नविन व्यासपीठ तयार करित आहोत.

# निसर्ग मित्र समितीतर्फे वलवाडीत हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांना जयंती निमित्ताने अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्गमित्र समितीच्या वलवाडी स्थित कार्यालयात हरीत क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन राज्य महासचिव संतोषराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरी करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, जिल्हाध्यक्ष डी.बी. पाटील, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र नगराळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रथम मान्यवराच्या हस्ते वृक्षपुजा करून कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष डी.बी. पाटील, जिल्हा सचिव विश्वास पगार, आदर्श शेतकरी प्रा. विजय बेहेरे, गोंदूरचे माजी उपसरपंच चेतन भदाणे, सुधीर सनेर आदी शेतकऱ्यांनी आपला अनुभव सांगितला.

याप्रसंगी जिल्हा संपर्क प्रमुख शाहीर विज वाघ, धुळे तालुका उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील, धुळे शहर अध्यक्ष प्रा. एच.ए. पाटील, धुळे शहर कार्याध्यक्ष प्रा.डॉ. प्रविण नेरपगार, धुळे तालुका संपर्क प्रमुख कांतिलाल देवरे, जयहिंद कॉलेजचे प्रा. भदाणे, सुरेश बैसाणे, माजी सैनिक मुरलीधर बाविस्कर, राजेंद्र पाटील, प्रसिध्दी प्रमुख हर्षल महाजन आदी पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निसर्ग अहिरे, हर्षल महाजन, राकेश जाधव, प्रा विजय बेहेरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचालन साक्री तालुका अध्यक्ष राकेश जाधव व आभार प्रदर्शन धुळे शहराध्यक्ष प्रा.एच.ए.पाटील यांनी केले. यावेळी सर्व पदाधिकारी यांनी प्रत्येकी पाच देशी वृक्ष लावण्याचा संकल्प केला अशी माहीती निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे यांनी पत्रकाद्वारे दिली.





# अवैध बनावट दारूचा कारखाना उद्ध्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात मोगलाई भागात फुले नगर, पाटकिनारी, बौध्द विहार समोर असलेल्या पत्र्याचे छत असलेल्या घरात काही व्यक्ती बनावट विदेशी दारु तयार करुन त्याची विक्री करीत आहे. त्यावरुन पोनिसो यांनी गुन्हेशाध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत करुन सदर बातमीची खातरजमा करणे कामी व योग्य ती कारवाई करणे कामी आदेशीत केले असता सदर अधिकारी व अंमलदार मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री केली असता दि.१ रोजी १,०७,७३० रुपये किंमतीचे स्पिरीट ने भरलेले ड्रम इम्पेरियल ब्ल्यू, रॉयल स्टॅग या विदेशी मदयाच्या भरलेल्या व खाली बाटल्या बुच सिल पिंप, गाळणी बनावट मदय निर्मितीकामी लागणारे साहित्यासह बनावट मदय निर्मित्ती करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने नंदाबाई संजय केदार, वैशाली रविंद्र वाघमारे, रविंद्र उर्फ पप्पु वाघमारे, विशाल संजय केदार, सागर उर्फ दादु पिंपळे रा. फुलेनगर, पाटकिनारी, बुध्दविहार समोर मोगलाई धुळे असे व विदेशी बनावटीचे दारु खरेदीसाठी आलेले प्रदिपकुमार विराभाई पटेल, उदना सुरत गुजराथ, अनिता प्रदिपकुमार पटेल उर्फ अनिता राहुल साद यांचे निष्पन्न झाले आहे.

तरी वरील इसमांचे ताब्यात वरील वर्णनाचा व किमतीचा बनावट मदय निर्मित्तीचा मुद्येमाल मिळुन आल्याने त्याबाबत धुळे शहर पोलीस ठाण्यात वरील आरोपीतांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि संतोष तिगोटे करित आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक प्रविणकुमार पाटील अपर पोलीस अधिक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पो.अधि. ईश्वर कातकाडे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि नितीन देशमुख, सपोनि संतोष तिगोटे, पोउनि दिपक धनवटे, पोउनि दत्तात्रय उजे, सपोउनि भिकाजी पाटील, पोहेकॉ विलास भामरे, पोहेकॉ सतिष कोठावदे, पोहेकॉ अब्बास शेख, पोना अविनाश पवार, प्रल्हाद वाघ, कुंदन पटाईत, निलेश पोतदार, मनिष सोनगिरे, प्रविण पाटील, अविनाश कराड, बिवेक साळुंखे, शाकीर शेख, सुशीला वळवी, किरण भदाणे यांनी सदरची कारवाई केली आहे.





# संकुलाच्या डायव्हिंग खेळाडूंचे राष्ट्रीय स्तरावरील घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नुकत्याच राजकोट येथे पार पडलेल्या 38 सब ज्युनियर आणि 48 ज्युनियर डायव्हिंग नॅशनल चॅम्पियनशिप 2022 या स्पर्धेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्ले च्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. मुलींच्या १८ वर्षाखालील आणि १३ वर्षाखालील गटात महाराष्ट्राच्या संघाने सांघिक विजेतेपद पटकाविले तर मुलांच्या तिन्ही गटात सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डच्या संघाने सांघिक विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली.

या स्पर्धेत महाराष्ट्राला एकूण ५ सुवर्ण पदके, ७ रौप्य पदक आणि ८ कांस्य पदके मिळाली आहे. या खेळातील काही स्पर्धकांनी विशेष कामगिरीने तिथल्य प्रत्येकाचीच मन जिंकून गोल्डन गर्ल आणि गोल्डन बॉय असे किताब मिळवले. या स्पर्धेचे सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राच्या संघात प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात सराव करणाऱ्या ४ खेळाडूंची निवड झाली होती. संकुलाची क्षमा बंगेरा हीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत मुलींच्या १८ वर्षाखालील गटात १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग आणि ३ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग दोन्ही क्रीडा प्रकरात सुवर्ण पदक पटकावले.

वयाच्या १२ वर्षापासून क्षमा हीने संकुलात डायव्हिंग या खेळाचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली आणि ५ वर्षांच्या सततच्या प्रयत्नांनी तीने इथ पर्यंत मजल मारली. केया प्रभु हीने मुलींच्या १५ वर्षाखालील गटात १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या प्रकारात रौप्य तर हायबोर्ड डायव्हिंग या प्रकारात कांस्य पदक पटकावले. मुलांच्या १८ वर्षाखालील गटात कबीर राव याने १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग आणि ३ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या दोन्ही क्रीडा प्रकारात सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड च्य मुलांशी सामना करत कांस्य पदक पटकावले तर स्वराज लाड याने प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन मुलांच्या १३ वर्षाखालील गटात १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या प्रकारात कांस्य पदक पटकावले.

संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू आणि सचिव डॉ. मोहन अनंत राणे सर यांचे नियमित सहकार्य आणि प्रशिक्षक सायली महाडीक आणि तुषार गितये यांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर खेळाडूंनी इथपर्यंत मजल मारली.



# पंचायत समिती व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात दि.२५/०६/२०२२ ते दि.०१/०७/२०२२ या कालावधीत कृषि संजीवनी सप्ताह सुरू होता. कृषि संजीवनी कार्यक्रमाची सांगता करून आज महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती असल्याने पंचायत समिती सोयगाव व कृषि विभाग सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने कृषि दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सदरील कार्यक्रमात एस. बी. पावर तालुका कृषि अधिकारी, सोयगांव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस उत्पादकता वाढ व मुल्यसाखळी विकास प्रकल्प, तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रबोध चव्हाण, उपविभागीय कृषि अधिकारी, सिल्लोड यांचे मार्फत त्यांची आवडती योजना पोक्रा बाबत येणाऱ्या विविध घटकांची माहिती देण्यात आली. प्रकाश नाईक गट विकास अधिकारी पंचायत समिती सोयगांव यांनी कै. वसंतराव नाईक यांच्या जीवनक्रमाबद्दल माहिती दिली तसेच कृषि क्षेत्रात महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढवा यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन सर्व कर्मचारी व अधिकारी यांना केले. व्हि. टी. जाधव नायब तहसिलदार सोयगांव यांचे मार्फत कृषि क्षेत्रात पिक फेरपालट, ई पिक पाहणी व नोंद, पी.एम. किसान या योजनाची माहिती देण्यात आली.

एस.जी. वाघ मंडळ कृषि अधिकारी, बनोटी यांचे मार्फत राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस उत्पादकता वाढ व मुल्यसाखळी विकास प्रकल्प, महाडीबीटी, पोक्रा, तसेच सेंद्रिय शेती योजनेची माहिती देण्यात आली. रविंद्र रामदास पाटील कृषि भूषण जरंडी यांनी कापूस क्षेत्रात जरंडी गावाने केलेल्या प्रगती बद्दल, गट व शेतकरी उत्पादक कंपनी याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. समाधान संतोष पाटील प्रगतशील शेतकरी घोसला यांनी सेंद्रिय शेती व नैसर्गिक झेरो बजेट शेती याबाबत माहिती दिली. ज्ञानेश्वर धनराज वाघ प्रगतशील शेतकरी घोसला यांनी सरपंच असताना आत्महत्याग्रस्त लाभार्थीयांचे साठी केलेल्या कामाचा अनुभव सांगितला.

ज्ञानेश्वर विठ्ठल खैरनार यांनी दुग्धव्यवसाय व उद्योगातील विविध संधी याबाबतची अशी माहिती अमोल पाटील (महाजन) तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी दैनिक अधुनिक केसरीचे पत्रकार गोकुळसिंग राजपूत याच्याशी बोलताना दिली.


ए.एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सोयगांव यांनी PMFME व AIF या योजनांची माहिती दिली. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डि. एस. साळुंखे विस्तार अधिकारी पंचयात समिती यांनी केले. आजच्या कार्यक्रमास कृषि विभागाचे जे. के. वाघ मंडळ कृषि अधिकारी, फर्दापूर, एस. जी. वाघ मंडळ कृषि अधिकारी, बनोटी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, ग्रामसेवक तसेच तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी यांची उपस्थिती होती.

# राज्य पुरुष बेसबॉल स्पर्धेसाठी औरंगाबाद संघ सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दि.2 ते 4 जुलै 2022 दरम्यान विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा औरंगाबाद येथे होणाऱ्या 15 व्या राज्य अजिंक्यपद पुरुष बेसबॉल स्पर्धेसाठी औरंगाबाद जिल्हा संघ सज्ज झाला आहे.

या संघाला शुभेच्छा देण्यासाठी क्रीडा अधिकारी चंद्रशेखर घुगे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी डॉ. दिनेश वंजारे, क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, योगेश कुलकर्णी, रफिक जमादार, औरंगाबाद जिल्हा बेसबॉल सचिव गणेश बेटुदे, सुरेश फुके, फकीरराव घोडे, सदानंद सवळे, क्रीडा मार्गदर्शक पूनम नवगिरे, भीमा मोरे, सचिन बोर्डे तसेच स्पर्धेसाठी डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ.उदय डोंगरे, यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



औरंगाबाद जिल्हा पुरुष संघ पुढीलप्रमाणे तेजस पांडेय, रोहित तुपारे, रोहित चव्हाण, रोहित शेळके, शशांक विश्वकर्मा, यश थोरात, चैतन्य तिडके, सचिन लहाने, अदित्य नागलोत, दिपक भवर, यश वाघ, ऋषिकेश पुरवगेल, अविनाश पांदे, शंतनू वेताळ, गणेश चव्हाण, आकाश राऊत तसेच प्रशिक्षक म्हणून गणेश बेटूदे व अक्षय बिरादार, संघ व्यवस्थापक संतोष आवचार हे आहेत.



# भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाने प्रिन्सेस चषक स्पर्धेत रचला इतिहास

आधुनिक केसरी न्यूज

**नाखोन पाथोम, थायलंड :** भारतीय वरिष्ठ महिला व्हॉलीबॉल संघाने ऐतिहासिक कामगिरी करत प्रिन्सेस चषक महिला चॅलेंज कप स्पर्धेत रौप्य पदक पटकावून इतिहास रचला. प्रिन्सेस चषक AVC महिला चॅलेंज कप आज नाखोन पाथोम, थायलंड येथे संपन्न झाला.

थायलंड संघाकडून आज भारताचा निसटता पराभव झाला. थायलंड संघाने आज झालेल्या अंतिम लढतीत भारताचा पाच सेट रंगलेल्या फरार सामन्यात ३-२ असा पराभव केला (२३-२५, २५-१२, २५-२२, १८-२५, १५-१३). अंतिम विजेता निश्चित करण्यासाठी त्यांच्या शेवटच्या गुणा पर्यंत सामन्यात संघर्ष बघायला मिळाला. या अतिथतीच्या लढतीत भारताकडून शक्तिशाली अनुश्री केपी, कर्णधार निर्मल, सूर्या यांनी अप्रतिम खेळाचे प्रदर्शन केले.

सरन्याला सर्वोत्कृष्ट युनिव्हर्सल, जिनी के.एस. सर्वोत्कृष्ट - सेटर आणि अस्ति डी. यांना तृतीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट लिबेरो म्हणून घोषित करण्यात आले.

रौप्यपदक पटकावणाऱ्या भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाचे प्रा.डॉ. अच्युता सामंता, एम.पी.अध्यक्ष, व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया, रामावतार सिंग जखाड, अनिल चौधरी आदींनी सर्वांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट


गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परीक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त

MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910